**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०४/ २०१८.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : ०१/०१/२०१८.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०४, बुधवार दिनांक ०३ / ०१ /२०१८.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती.............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी दिनांक ३०/१२/२०१७ रोजी झालेल्या सभेमधील तहकुब विषयासाठी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक ०३/०१/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेचे नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** तहकुब विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

मा.महापौर साहेब यांच्या आदेशान्वये.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : सर्व विभाग प्रमुख

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक - ४ शनिवार दिनांक ३० / १२ / २०१७ रोजी दुपारी १.०० वाजता **(राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर येथे** होणा-या सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| २५ | मागील सभा दिनांक १४/०६/२०१६, १९/११/२०१६, १९/११/२०१६, ७/१२/२०१६, २२/१२/२०१६, २७/०३/२०१७, १४/०९/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत. |
| २६ | दुखवटयाचे प्रस्ताव |
| २७ | अहमदनगर माळीवाडा येथील विशाल गणपती मंदिराच्या दक्षिणेकडील सि.स.नं.४६८५/१/२ ही जागा विशाल गणपती मंदिर ट्रस्टला भाडे तत्वावर देणे बाबत...<br>संदर्भ : मा.महापौर, अहमदनगर महानगरपालिका, यांची दिनांक १०/१०/२०१७ ची यादी. |
| २८ | वाहन वापर प्रतिपुर्ती योजनेमध्ये समाविष्ट करणे बाबत.<br>संदर्भ :-१) श्री.व्ही.जी.सोनटक्के,प्रभारी शहर अभियंता, २) श्री.काकडे एम.डी., पा.पु.विभाग प्रमुख, ३) श्री.आर.जी.मेहेत्रे प्रकल्प विभाग यांचा अर्ज. |
| २९ | दै.लोकमत या वृत्तपत्रातुन प्रसिध्द केलेल्या जाहिरातीच्या दि.१२/०१/२०१५ ते ०३/०५/२०१५ या कालावधीतील बींलाबाबत. |
| ३० | सन २०१६-२०१७ दिवाळी सणानिमित्त महानगरपालिकेमधील पात्र कायम कर्मचा-यांच्या सानुग्रह अनुदाना बाबत झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत.<br>संदर्भ : १) मनपा कामगार युनियन यांचे कडील जा.क्र. १२/ श्रमिक /२०१७ दिनांक ०३/०८/२०१७ रोजीची संप नोटीस.<br>२) मा.सहाय्यक कामगार आयुक्त,अहमदनगर यांचे दि.३/८/२०१७ चे पत्र.<br>३) दिनांक ५/१०/२०१७ रोजी मा. पदाधिकारी,अधिकारी, व कामगार युनियन प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक सभावृतांत.<br>४) मा.औद्योगिक विवाद अधिनियम १९४७च्या कलम १२(३) अन्वये मा.पदाधिकारी, अधिकारी व कामगार युनियन प्रतिनिधी यांचेमध्ये झालेला करारनामा. |
| ३१ | अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान (National Urban Livelihoods Mission) अंतर्गत शहरी उपजिविका केंद्र चा प्रस्ताव मंजुरी बाबत..<br>संदर्भ :- मा.नगरविकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक एनयुएल-२०१४/प्र.क्र.१०४/नवि-३३ दिनांक २८/०८/२०१४ |
| ३२ | महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदास मंजुरी मिळणे बाबत<br>संदर्भ - १) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,शासन निर्णय क्र.नमाशा २००९ (४९७/०९) माशि-१ दिनांक ११ जुन २००९, २) महाराष्ट्र क्रमांक-नमाशा-२००९ (४९७/०९) माशि-१ दिनांक १८ जुलै २००९, |

| | |
|---|---|
| ३३ | महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती वर्षे २०१०-२०११ सुजल व निर्मळ अभियान अंतर्गत शहरातील सर्व पाणी ग्राहकांच्या नळांना मीटर बसविणेसाठी महानगरपालिकेकडुन तयार करणेत आलेला प्रकल्प अहवालास मा.शासनाकडुन मंजुरी मिळणे बाबत. |
| ३४ | जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१८-२०१९ विहित नमुन्यात प्रारुप आराखडा सादर करणे बाबत. |
| ३५ | सारसनगर या भागाला **"क्रांतीज्योती सावित्रीआई फुलेनगर"** असे नामकरण करणे बाबत...<br>संदर्भ - मा.महापौर यांचेकडील नगरसेवकांचे दि.०३/०१/२०१७ रोजीची यादी व मा.महापौर कार्यालय जा.क्र.पी.ए.८५४ दि.०७/०२/२०१७ व १४४ दि.२५/०५/२०१७ चे पत्र. |
| ३६ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील भिंगार स.नं.३४४/१,३४४/२ या मंजुर रेखांकनातील खुली जागा (क्षेत्र १५९१.००) यशवंत माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना क्रीडांगण म्हणून मिळणे बाबत... |
| ३७ | महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार अनधिकृत व नियमबाह्य मोबाईल मनोरे / बांधकाम दंड / प्रशमन शुल्क आकारुन नियमीत करणे बाबत..<br>संदर्भ :- १) दुरसंचार सुविधांच्या जाळयासाठी उपकरणाची व बेस स्टेश यांच्या उभारणीसाठीचा सर्व समावेशक विनीयम अंतर्भुत करणे बाबत दि.०४/०३/२०१४ रोजीचा शासन निर्णय, २) ड वर्ग विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०१६ मधील नियम क्र.३१.७ (बी) नुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत. ३) अहमदनगर महानगरपालिका ठराव क्र.३ दि.१५/०३/२००८ |
| ३८ | मंजूर विकास योजना, अहमदनगर (मुळ हद्द) (दुसरी सुधारीत)<br>मौजे सावेडी, अहमदनगर येथील स.नं.२२८,२२९,२३० व १९४ पैकी २ हेक्टर जमिनीवर मंजुर विकास योजनेत सार्वजनिक सुविधा (Public Aminity) हे आरक्षण प्रस्तावित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधिल कलम ३७ अन्वये फेर बदलाची कार्यवाही करणे बाबत. |
| ३९ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : २२/१२/२०१७

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- २५** **दिनांक : ३०/१२/२०१७.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** मागील सभा दिनांक १४/०६/२०१६, १९/११/२०१६, १९/११/२०१६, ७/१२/२०१६, २२/१२/२०१६, २७/०३/२०१७, १४/०९/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

मागील सभा दिनांक १४/०६/२०१६, १९/११/२०१६, १९/११/२०१६, ७/१२/२०१६, २२/१२/२०१६, २७/०३/२०१७, १४/०९/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

**चर्चा :-**

**मा.श्री.कैलास गिरवले :-** जबाबदार अधिकारी या ठिकाणी दिसत नाही.

**मा.महापौर मॅडम :-** शनिवारी जी सभेमध्ये चर्चा झाली. सर्व अधिका-यांना चांगली वागणुक दिली नाही. असे अधिका-यांचे म्हणणे आहे. त्यामुळे आजच्या सभेत अधिकारी उपस्थित रहाणार नव्हते. या संदर्भात युनियनच्या पदाधिकारी यांचेशी चर्चा केली.

**मा.उपमहापौर श्री.छिंदम :-** वाईट वागणूक कोणती दिली म्हणजे आम्हाला त्यात सुधारणा करता येईल.

**मा.महापौर मॅडम :-** व्यवस्थीत प्रश्न विचारले म्हणजे अधिकारी व्यवस्थीत उत्तरे देतील.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** वाईट वागणूक कोणी दिली नाही. कोणाला शिवीगाळ करण्यांत आली नाही.

**मा.महापौर मॅडम :-** त्यांच्या ज्या अपेक्षा होत्या त्या आपल्यापर्यंत पोहोचवल्या. एकसोबत सर्व नगरसेवक उठून आपले म्हणणे मांडता. कोणताही राग व्देष न ठेवता प्रश्न विचारा ते उत्तर देतील.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** आमच्याकडून काय वाईट वागणूक मिळाली हे त्यांनी सांगावे. बाहेरचा माणूस असा आरोप करतो कसा आयुक्त साहेब आपण त्यादिवशी सभागृहात नव्हता ज्या अधिका-यांवर आरोप झाले आहेत त्यांची चौकशी होईपर्यंत सभागृहात बसू नये अशी सर्व सभागृहाने मागणी केली . दोषीवर कारवाई व्हायला पाहीजे. आयुक्त साहेब यांचेकडे जर कोणी तक्रार केली असेल तर कोणी अधिका-यांनी अशी तक्रार केली या गोष्टीचा खुलासा झाला तर बरे होईल. युनियनचे पदाधिकारी यांचे सोबत बैठक झाली त्यात काय निर्णय झाला त्यांची पगारी करणार का बिन पगारी करणार या बाबत आम्ही कोणाची गय करणार नाही. पैशाचा गैरवापर होणार असेल तर आम्ही ते सहन करणार नाही.

**मा.श्री.गणेश भोसले :-** काल मी एक पत्र मा.महापौर यांना दिले माझ्या प्रभागात एखादे काम सुचविले त्या दोन्ही नगरसेवकांना हे काम कळविणे इंजिनियर यांना बंधनकारक करा. नगरसेवकांना कसे कळणार ति-हाईत व्यक्तीने जर माझ्या वॉर्डात काम टाकले ते समजले पाहिजे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** भोसले साहेबांनी जी सूचना मांडली त्यास मी अनुमोदन देतो.

**मा.श्री.गणेश कवडे :-** तुम्ही जर एखादे काम माझ्या वॉर्डात हे काम करु नका असे सांगीतले असेल तर ते काम कसे करता येईल.

**मा.श्री.सचिन जाधव :-** जो नगरसेवक विरोध करील त्या वॉर्डातील पब्लीक पाहून घेईल.

**मा.महापौर मॅडम :-** प्रत्येक प्रभागातील नगरसेवकास त्या त्या कामाबाबत माहिती देणे बाबत अभियंता यांनी कार्यवाही करावी.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** जो प्रकार घडला बोगस बील काढले अपहार झाला त्याबाबत चौकशी करा. ५ दिवस उलटले मा.आयुक्त यांनी काय चौकशी केली याचा खुला करावा काय कार्यवाही केली.

**मा.महापौर मॅडम :-** अधिका-यांचा जो विषय होता त्यावर आयुक्त साहेब बोलतील.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** गेल्या महासभेमध्ये वॉ.क्र.१ ते २८ या ठिकाणी पथदिवे बसविणे बाबत कथीत मुद्याबाबत चर्चा झाली सोमवारी हजर झाल्यानंतर सर्व संबंधित अधिका-यांकडुन याबाबत माहिती घेतली. विद्युत विभागातील संबंधीत कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्याबाबत सूचना दिल्या. त्या विषया संबंधीच्या फाईल या त्या विभागाकडे आढळून न आल्यामुळे शोध चालू आहे. या कामी दोन सदस्यांची चौकशी समिती गठीत करण्यांत आली असुन यामध्ये १) अति.आयुक्त, २) सहाय्यक संचालक नगररचनाकार, यांनी सर्व कागदपत्र पाहून जागेवर जावून काम झाले किंवा नाही या गोष्टी सर्व पाहून चौकशी अहवाल सादर करतील. यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल.

**मा.श्री.सचिन जाधव :-** धोंगडे साहेब यांनी ३ ते ४ ठिकाणी कामावर जावून पाहणी केली त्या ठिकाणी काय आढळून आले त्याबाबत माहिती द्यावी.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** महापौरांनी जो निलंबनाचा आदेश दिला त्याबाबत खुलासा करा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** ज्यावेळी तुम्ही पाहणी केली त्यावेळी संबंधित वॉर्डचे नगरसेवक सोबत होते का. कोण कोण बरोबर होते.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** कोटेशनमध्ये जो उल्लेख केला आहे त्याप्रमाणे माहिती द्या.

**मा.श्री.अभय आगरकर :-** मा.आयुक्त साहेब यांनी चौकशीचे निर्देश दिले आहेत. चौकशी पूर्ण होईपर्यंत या सभागृहात चर्चा करणे योग्य नाही. प्राथमिक अवस्थेत चौकशीला सुरुवात होत आहे. सभागृहात जर या विषयावर चर्चा झाली तर त्या चौकशीचा काय उपयोग.

**मा.श्री.सचिन जाधव :-** प्रशासनाने सांगावे याला ५ दिवस झाले.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** धोंगडे साहेब जे बोलतील त्यावर ठाम रहा.

सभागृहात गोंधळ

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** त्या ठेकेदाराच्या आधीची कामे काढा.

**मा.महापौर मॅडम :-** सर्वांनी अगोदर खाली बसून घ्या.

**मा.सौ.शारदा ढवण :-** वॉ.क्र.१,२८ मध्ये जो ४० लाखाचा भ्रष्टाचार झाला त्या संदर्भात जर कोणी अधिका-याच्या सह्या नाहीत. पूर्ण शहराची मान खाली घालण्याची वेळ आली आहे. तो काय दादा लागून गेला का. अधिका-यांच्या सह्या नाहीत त्या अधिका-यांनी गुन्हे दाखल केले पाहीजे. त्यांच्यावर का गुन्हे दाखल करीत नाही. नगरसेवकांनी आंदोलन केले तर अर्ध्या मिनीटात गुन्हा दाखल होतो मग या ठेकेदारावर का नाही.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** त्वरीत सर्वांवर कारवाई करावी सामान्य जनतेने काय फक्त घरपट्टी भरायची का.

**मा.सौ.भिंगारदिवे :-** ठेकेदार काम करतो का रजिष्टर सांभाळतो ? अधिका-यांना विचारले फाईल कुठे, तर अधिकारी सांगतात फाईल ठेकेदाराकडे आहे. असे सांगतात. प्रत्येक वेळेला पुरुष नगरसेवकच बोलतात.

**मा.सौ.मालन ढोणे :-** अधिका-यांना सभागृहाबाहेर काढले हे आम्हालाही पटले नाही. अधिका-यांनी ठेकेदारांकडे फाईल न देता लक्ष द्यावे.

**मा.श्री.अभय आगरकर :-** संपूर्ण अहवाल येवू द्या त्या प्रकरणाची व्याप्ती पाहिली असता प्रायमाफॅसी अपहार झाला असे दिसते. आपले समाजाप्रती उत्तरदायित्व आहे. समाजापुढे त्या पध्दतीने गेले पाहिजे. प्रशासन व अधिकारी तेवढेच या प्रकरणामध्ये जबाबदार आहेत. या सर्व प्रकरणामध्ये आपण काल निर्देश दिले आहेत. पोलीस स्टेशनला फिर्यांद दिली का, फिर्याद का दाखल होवू शकली नाही. या गोष्टीतील काही उणीवा असतील त्या दूर केल्या पाहीजे. खुलासा या नगरकरांना समजला पाहिजे. एक दोन प्रकरणाची चौकशी झाली असेल ते सांगायला पाहिजे. एखाद्या प्रकरणा संदर्भात काय आढळून आले त्याबद्दल स्पष्टोक्ती द्यावी.

**मा.महापौर मॅडम :-** अधिका-यांनी खाली बसा आपण आपआपसात बोलू नका, आपआपसात बोलू नका.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** धोंगडे साहेबांनी सर्व खुलासा करावा तुमच्या बरोबर कोण होते तुम्ही वॉर्डातील नगरसेवकाला फोन केला का ?

**सभागृहनेता श्री.गणेश कवडे :-** जनतेत चुकीचा संदेश जात आहे मागील ४-५ बोर्डात आपण आपआपसात भांडतो. जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण सगळे आग्रही असतो.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** संपूर्ण सभागृहात आगरकरांचे वजन होते. त्यांना सर्व नगरसेवक गुरु स्थानी मानतात. महाभारतात भिष्म पितामहांसारखे वजन आहे तुमची प्रतिमा नगर शहरात मोठी प्रतिमा आहे.

**नगररचनाकार श्री.धोंगडे :-** दिनांक ३०/१२/२०१७ रोजीच्या सभागृहातील भावना आम्ही मा. आयुक्तांना सांगीतल्या. मा.आयुक्तांनी चौकशी सुरु करायला सांगीतले. या चौकशीकामी आम्हाला फाईल व कागदपत्र उपलब्ध झालेले नाहीत. चौकशी अधिकारी यांनी विभाग प्रमुखांना फाईल उपलब्ध करुन देणे बाबत सुचित केले आहे. यादी प्रमाणे माहिती घ्यायला मला आयुक्तांनी सांगीतले. यादी अधिकृतरित्या आयुक्तांकडून आलेली नाही. चौकशी समितीचा अहवाल आम्ही आयुक्तांकडे सादर करणार आहोत. मुदतीत चौकशी पूर्ण करण्यांत येईल. प्रिमॅच्युअर अवस्थेत बोलण योग्य होणार नाही. पूर्ण चौकशी झाल्यानंतर अहवाल मा.आयुक्तांकडे सादर करु व सभागृहात मांडण्यात येईल.

**उपमहापौर श्री.छिंदम :-** फाईल सापडत नसल्याबाबत तक्रार दाखल केली का ? ती कामे बजेट रजिष्टर मध्ये न खतवता कामे केली, त्याबाबत गुन्हा दाखल का करीत नाही. बजेट रजिष्टरला न खतविता खतविले असे भासवून सर्वांच्या स्वाक्ष-या घेवून बीले काढण्यात आली. मा.महापौरांबाबत काल टीव्हीवर अपशब्द वापरले. अशांना तुम्ही पाठीशी घालणार का. तुम्ही गुन्हे दाखल करा. तो अपमानास्पद वक्तव्य करतो. आतापर्यंत सचिन लोटके याने केलेल्या संपूर्ण कामाची चौकशी करा. फाईली भेटतील त्यावेळेस भेटतील. शहर अभियंत्यांनी गुन्हे दाखल करण्याचा आदेश द्या. बजेट रजिष्टरच्या आधारावर आजच आपण गुन्हा नोंदवू शकतो. केडीएमसी व्दारे बीलाची नोंद आहे. परंतु आज रोजी गुन्हयाला विलंब का लागतो.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** याबाबत बजेट रजिष्टरची तपासणी करण्यांत येईल.

**उपमहापौर श्री.छिंदम :-** सभापती साहेबांनी व इतर अधिका-यांनी बजेट रजिष्टरची तपासणी मा.स्थायी समितीच्या सभेमध्ये केली आहे. पुन्हा तपासणीची काय गरज आहे.

**मा.सौ.सुवर्णा जाधव :-** मा.स्थायी समिती सभेमध्ये ते रजिष्टर मागवून घेण्यांत आले व तपासणी करण्यांत आली. त्या रजिष्टरमध्ये कामाची नोंद आढळून आलेली नाही.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** सन्माननीय महापौरांनी मला आताच मा.स्थायी समितीमध्ये जी चर्चा झाली त्याबाबत माहिती दिली.

**मा.महापौर मॅडम :-** विषय घेवू दिले नाही तर मी सर्व विषय मंजूर करेल. आपणाला विषय महत्वाचे वाटत नसतील तर मी सर्व विषय शेवटी मंजूर करील. एक महिला महापौर असतांना सर्व नगरसेवक जर आपआपसात बोलत असतील तर विषयपत्रिकेवरील विषयावर चर्चा होणार नाही.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** रजिष्टर तपासून गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल व चौक्शी चालू राहील.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** हा गुन्हा दाखल करतांना मलाही सांगा इतरही नगरसेवकांना सांगा आम्ही बरोबर येतो.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :-** मा.उपमहापौरांनी जो प्रश्न मांडला होता स्थायी समितीत बजेट रजिष्टर दाखवले ते रजिष्टर सभागृहात मागवले का ?

**मा.श्री.दिप चव्हाण :-** टेक्नीकल प्रश्नाची शहनिशा न करता गुन्हा कसा घडला. सर्व गोष्टी अमुक व्हायला पाहिजे तमुक व्हायला पाहिजे. स्थायी समितीत सर्व शहरनिशा पूर्ण झाली आहे. बोराटे साहेबांनी टेक्नीकल प्रश्न सभागृहात येण्यापूर्वी विचारले आहेत. आयुक्त साहेब नवीन आहेत. टेक्नीकल मुद्यांबाबत बोलायचे व विषय टाळायचा हे चालणार नाही. बजेटमध्ये प्रोव्हीजन नाही. लेखापरिक्षक यांनी माझी स्वाक्षरी नाही असे दोन ठिकाणी कबुल केलेले आहे. अपहार खोटे कागदपत्र तयार करुन अकौंट मध्ये बील काढलेले आहे. याठिकाणी ५-६ दिवस झ ाले फाईल नाही म्हणून चौकशीचे कामी वालगुडे साहेबांनी फाईल उपलब्ध झाल्या नाहीत असा शेरा मारला असे समजते. तुम्ही ठेकेदारास पाठीशी घालणार असाल तर आमची जबाबदारी नाही. फाईली सांभाळायची जबाबदारी कोणाची या संस्थेचे कागदपत्र बाहेर जात असतील तर याला जबाबदार कोण. मा.स्थायी समिती सभेमध्ये या घोटाळयाबाबत चर्चा झाली त्याच दिवशी सर्व फाईली ताब्यात घ्यायला पाहीजे होत्या. सभागृहात मत मांडण्याचा सर्वांना अधिकार आहे. टेक्नीकल बाबी पाहायचे काम तुमचे आहे. एक महिन्यात जर चौकशी पूर्ण झाली नाही व गुन्हा दाखल करण्यास उशीर झाला तर त्याला जबाबदार कोण राहणार ? सभागृहाने कोणाचा अवमान केलेला नाही. ठेकेदारांचे देणे ३० कोटी रुपये झालेले आहे. बजेट रजिष्टरला नोंद नाही. तर तुम्ही बाहेर जावून कोणते काम पाहणार. या कामाचे लेखापरीक्षण झालेले नाही. ऑडीटरच्या सह्या नाहीत. इलेक्ट्रीक विभागाचे लिपीक यांनी केडीएमसी केली नाही असे सभागृहात सांगीतले. अजुन कोणता पुरावा तुम्हाला पाहीजे. पूर्ण सभागृहाने त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी केली व ती मंजूर झाली. अपहारामध्ये जर पीठासीन अधिकारी जर आदेश देत असतील तर त्याचा मान राखयचा की नाही ? आपले कर्तव्य पार पाडताना जबाबदारीने वागावे. पिठासीन अधिका-यांनी आदेश दिला भ्रष्टाचाराचा विषय बदलण्यासाठी तुम्ही मार्ग बदलला. आगरकर साहेबांनी टेक्नीकल सांगीतले. स्थायी समिती सभेत सांगायला पाहीजे होते. आम्ही अगोदर संपूर्ण चोकशी करणार. मग ५-६ महिन्यात गुन्हे दाखल करणार. सभागृहाची दिशाभुल तुम्ही करता. सन १९८५ पासून आम्ही सभागृहात आहोत वैयक्तीक बोलण्याचा कायद्याने आम्हाला अधिकार नाही. चूकीचे काम आम्ही सांगत असेल तर तुम्ही का करता. या बीलाची केडीएमसी २२ तारखेला व २३ तारखेला चेक निघतात. चव्हाण साहेबांच्या टेबलावर इतक्या फाईल आहेत मग याच फाईली कशा निघाल्या. महानगरपालिकेचे व्हीडीओ शुटींगचे फुटेज काढा. फाईल वर सह्या कोणी घेतल्या, खोटी कागदपत्र तयार करुन त्याने बीले काढली हे आमचे म्हणणे आहे. कसुन चौकशी करा. प्रथमदर्शनी सर्व सभागृह उच्च आहे. वसुली घरपट्टी लिपीक श्री. लोंढे यांनी केलेल्या अपहार प्रकरणाची एका दिवसात चौकशी लावली व त्याच्यावर गुन्हा दाखल केला. असे असतांना कामामध्ये भेदभाव का करता.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** त्या वेळेस मी महानगरपालिकेत कार्यरत नव्हतो.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** कर्मचा-यांवर २४ तासात गुन्हा व ठेकेदारावर अद्याप कारवाई होत नाही.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :-** यात अधिकारीही दोषी आहेत. त्यांच्यावरही कारवाई करा.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** यामध्ये जे जे दोषी असतील जिथुन केडीएमसी झाली तिथुन, चेक निघाला तिथपर्यंत सर्वांची जबाबदारी फिक्स करा.

**मा.महापौर मॅडम :-** विषय चालू करु द्या.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** केडीएमसी पासून चेक निघेपर्यंत कार्यालयीन कार्यपध्दतीमध्ये डॉक्युमेंटची तपासणी करतो आहोत.

**मा.श्री.संजय घुले :-** मा.संग्राम भैय्या जगताप यांनी जा.क्र.११०७ अन्वये मा.मुख्यमंत्री महोदय यांना दिनांक ०३/०१/२०१८ रोजी एक पत्र दिले आहे. बजेट रजिष्टर घोटाळया बाबत पत्र दिले आहे. ते वाचन केले.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** प्रथमतः ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्यांत येईल. आयुक्तांनी सांगावे.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** अगोदर ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्यांत येईल. इतरांचे चौकशी समिती मार्फत चौकशी करण्यांत येईल. समितीला आठ दिवसांची मुदत दिलेली आहे. चौकशी समिती नेमण्यांत आली आहे.

**मा.महापौर मॅडम :-** मध्येच सर्वजण उठून बोलतात.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** काल वालगुडे साहेब म्हणतात फाईल उपलब्ध नाही. तत्कालीन नगरपरिषदेमध्ये हसनशहॉ कब्रस्तान बाबत बाळासाहेब बोराटे यांनी प्रकरण काढले होते. त्या चौकशीचे काय झाले. या प्रकरणात सुध्दा असा पडदा पडेल. मी कोणाचाही अवमान करीत नाही. अधिका-यांची बाजू घेतली म्हणुन कोणी पत्रकारांकडे गेले नाही. सर्व अधिका-यांनी पेपरला आलेले स्टेटमेंट त्यांनी मागे घ्यावे. त्यांना आता संधी आहे. त्यांनी सभागृहासमोर सांगावे. काय अपमान झाला. कोण चुकीचे काम सांगत असेल त्यांचा आपण निषेध करु. अनेक नगरसेवक ३० वर्षे - ३५ वर्षे नगरसेवक म्हणून कामकाज करतात. इथापे साहेब तुम्ही पेपरला स्टेटमेंट दिलेले आहे. आमच्यावर दबाव टाकला जातो. तुम्ही आरोप करता आहात. तुमच्यावर कोण दबाव टाकतो त्यांचे नांव सांगा. आम्ही जनतेचे सेवक आहोत आम्हाला नागरिकांना उत्तरे द्यावी लागतात. त्यामुळे आम्ही तुम्हाला सभागृहात प्रश्न विचारले तर तुमचा अपमान कसा झाला. अधिका-यांकडुन आम्हाला कामाच्या अपेक्षा आहेत. भ्रष्टाचार होवू नये म्हणून नगरसेवक अधिका-यांना उभे करुन प्रश्न विचारतात. आयुक्त साहेब हा अपहार झालेला आहे. तुम्ही लवकरात लवकर चौकशी करुन दोषींवर कारवाई करा. अन्यथा कॉंग्रेस पक्षाकडुन तिव्र आंदोलन करण्यांत येईल.

**मा.सौ.छाया तिवारी :-** कुंपनानेच शेत खाण्यासारखे आहे. ठेकेदाराला पकडायला पाहिजे होते. तुमचा हा ढिसाळ कारभार चालू आहे. त्याबद्दल आम्ही निषेध करतो. कोणालाही पाठीशी न घालता कारवाई करावी. इलेक्ट्रीक पोल संदर्भात बील निघते. आठ दिवसाच्या चौकशीची वाट पाहू नका. तात्काळ कारवाई करा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** ज्यावेळेस वॉर्डात काम सूरु असेल त्यावेळेस नगरसेवक सुपरव्हीजन करतो. महानगरपालिकेचे अधिकारी कामाचे ठिकाणी नसतात. संबंधित इंजिनियर व मनपाचे अधिकारी संबंधित ठिकाणी राहणे बंधनकारक आहे. निधीचा अपव्यय होवू नये अशी सुध्दा नगरसेवकांची इच्छा असते. होणारे घोटाळे टाळण्यासाठी इलेक्ट्रीक सुपरवायझर असावा. कंत्राटी पध्दतीने इंजिनियर नेमा.

**मा.श्री. शेख नजीर अहमद अ.रज्जाक :-** ३५ वर्षापुर्वी काम चालू असतांना इंजिनियर स्वत: कामाचे ठिकाणी येत होते. नगरसेवकांना भेटत होते. आयुक्त साहेब हे लोक फार विचीत्र आहेत बाहेर फार मोठी चर्चा चालू आहे. ह्या इंजिनियर लोकांची मोठमोठी घरे आहेत.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** खरात साहेबांना गुन्हा दाखल करायला पाठवा.

**मा.महापौर मॅडम :-** विषयपत्रिकेवरील विषय घ्या.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** आम्ही इतिवृत्ता संदर्भात पत्र दिले ते वाचा दिनांक ०३/०१/२०१८ रोजीचे पत्राचे वाचन करण्यांत आले. वरील विषयपत्रिकेवरील विषया व्यतिरिक्त विषयास आमची संमती नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** प्रकरण ७ कलम ४३ मध्ये तरतुद काय आहे. ९० दिवसात जर प्रकरण जर सॅक्शन झाले नाही तर ॲटोमॅटीक संमती गृहीत धरली जाते.

**प्र.नगरसचिव श्री.तडवी :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन मधील (स) मध्ये जेथे आयुक्तांच्या कोणत्याही प्रस्तावास महानगरपालिकेच्या मंजूरीची किंवा मान्यतेची आवश्यकता असेल त्याबाबतीत महानगरपालिका नगरपालिका सचिवांकडे तो प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिकेच्या लगत घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासुन नव्वद दिवसांच्या आत असा कोणताही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील अशी तरतुद आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** आयुक्त साहेबांची मंजूरी देतील आमची मान्यता नाही. ९० दिवसापेक्षा जास्त कालावधी या इतिवृत्त मंजूरीस घेण्यात आले आहे. पिठासीन अधिकारी यांनी रुलिंग द्यावे आयुक्त त्यांचे स्तरावर मंजूरी देतील.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रमाणे जी कार्यवाही करायची आहे. ते अधिकार आहेत.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** पान नंबर १७ वर बजेटमध्ये दर वाढले का ?

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** सेप्टीक टँकचे ५०० रुपये वाढले ते खाली आहे त्याप्रमाणे रक्कम वसुल झाली आहे. चुकीचा पायंडा पडला आहे.

---*---

**ठराव :-**

मा.सौ.अनिता राठोड यांनी दिलेल्या यादीनुसार दिनांक २२/१२/२०१६ प्रस्ताव क्रमांक ३७ मा.महासभेमध्ये घनकचरा व्यवस्थापन विभागाकडेस डी.पी.आर तयार करणेकामी कार्यवाही चालू आहे. त्याकरीता अंदाजे ३५ लक्ष रुपये देणे आवश्यक आहे. तसेच महानगरपालिकेमार्फत स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०१८ ची कार्यवाही चालू असल्याने कचरा व्यवस्थापन करणारे अत्यावश्यक देयक अदा करणे गरजेचे असल्याने मागील ठरावामधील १५०० डस्टबीन्स खरेदी कामी करण्यात आलेल्या ठरावानुसार फक्त ५०० नग लिटर बीन्स खरेदी करण्यात येणार असल्याने सदर कामी करण्यात आलेली तरतुद रक्कम रु.१.५० कोटी मधुन १ कोटी वरील डी.पी.आर व अत्यावश्यक सेवेतील बील अदा करणेकामी कार्यवाही करणेकरीता व मागील ठरावामधील डस्टबीन्स ऐवजी लिटरबीन्स असे शुध्दीकरण करणे यासह इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे यांनी दिलेल्या पत्रानुसार दिनांक २७/०३/२०१७ प्रस्ताव क्रमांक ४१ मा.महासभेमध्ये रेखांकन अंतर्गत सुधारणा या लेखाशिर्षा अंतर्गत प्रत्यक्ष झालेला खर्च प्रत्यक्ष जमा झालेल्या रक्कमेतून करण्याबाबत तसेच विकास भार या लेखाशिर्षा अंतर्गत प्रत्यक्ष झालेला खर्च हा रेखांकन व विकास भार रक्कमेवर जमा झालेल्या व्याजातून करण्याबाबत उपरोक्त लेखाशिर्षा अंतर्गत ३१ मार्च २०१७ अखेर झालेला प्रत्यक्ष खर्च सुधारीत अंदाजपत्रकामध्ये समावेश करुन इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करण्यास ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

मा.सौ.शारदा ढवण यांनी दिलेल्या पत्रानुसार दिनांक २२/१२/२०१६ प्रस्ताव क्रमांक ३७ मा.महासभेमध्ये सावेडी स.नं.२८९ जुना पिंपळगांव रोड ते भिस्तबाग महाल पर्यंत ते तपोवन रस्ता मजबुतीकरण डांबरीकरण करणे या कामासाठी १४ व्या वित्त आयोग निधीतून खरेदी कामी करण्यांत आलेल्या ठरावातील बाबींमधुन नियोजन करुन तरतुद करणे बाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. याप्रमाणे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

मा.सौ.छाया सुरेश तिवारी यांनी दिलेल्या पत्रानुसार दिनांक १४/०९/२०१७ प्रस्ताव क्रमांक १६ मा.महासभेमध्ये  अहमदनगर सि.स.नं.७३६६/अ पैकी सिध्दार्थ नगर म्यु.पल कॉलनी या जागेतील घरांजवळील १०.६० फुट x ४१ फुट क्षेत्राची जागा संबंधीत जागा मालकांना खरेदी देण्याबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.२ विषय क्रमांक ९ दिनांक ०३/०६/२०१७ रोजी मंजूरी दिलेली आहे. सदर ठरावानुसार संबंधीत जागा मालकांना जागा देण्याबाबत मा.महासभा मंजूरी देण्यांत येत आहे. प्रशासनाने याबाबत पुढील उचित कार्यवाही करावी. इतिवृत्तामध्ये दुरुस्तीसह कायम करण्यास ही सभा मान्यता देत आहे. इतिवृत्त कायम करतांना या दुरुस्तीसह इतिवृत्त कायम करण्यांत यावे. याकामी आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने नियमानुसार करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.सौ.शारदा दिगंबर ढवण,

अनुमोदक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे,

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-
महापौर
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : २६** **दिनांक : ३० /१२ /२०१७**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** दुखवट्याचा प्रस्ताव.

| अ.नं. | विषय |
|---|---|
| १ | ज्येष्ठ हिंदी चित्रपट अभिनेते शशीकपूर यांचे सोमवार दिनांक ०४-१२-२०१७ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २ | काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री प्रियरंजन दास मुन्सी यांचे मंगळवार दिनांक २१-११-२०१७ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३ | डॉ. तनपुरे कारखान्याचे माजी अध्यक्ष रामदास पाटील धुमाळ यांचे मंगळवार दिनांक १२-१२-२०१७ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४ | पद्मशाली समाजातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व .माजी नगरसेवक शरद रच्चा यांचे मंगळवार दिनांक १९-१२-२०१७ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ५ | अहमदनगर शहरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व बालिकाश्रम संस्थेचे कार्यकारी विश्वस्त डॉ.जयंत करंदीकर रविवार दिनांक ३-१२-२०१७ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ६ | अहमदनगर शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस माजी शहराध्यक्ष व माजी नगरसेवक डॉ.रावसाहेब अनभुले रविवार दिनांक २६-११-२०१७ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ७ | माजी आमदार राजीव राजळे यांचे शनिवार दिनांक ०७-१०-२०१७ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ८ | माजी नगरसेवक अरूण हरिभाउ अबनावे यांचे मंगळवार दिनांक १०-१०-२०१७ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ९ | सरकारी कर्मचारी संघटनेचे नेते योगीराज खोंडे यांचे शुक्रवार दिनांक ०६-१०-२०१७ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १० | अहमदनगर जिल्हयातील राजकीय व सामाजिक तसेच सहकार क्षेत्रात काम करणारे कुंडलिकराव जगताप यांचे रविवार दिनांक १५-१०-२०१७ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ११ | शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार एस.एम.पाटील यांचे रविवार दिनांक २२-१०-२०१७ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १२ | अहमदनगर शहरातील ज्येष्ठ उदयोगपती व शिरूरचे माजी नगराध्यक्ष रसिकलाल धाडीवाल यांचे मंगळवार दिनांक २४-१०-२०१७ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १३ | नगर शहरातील सामाजिक कार्यकर्त्या जैबुनिसा शेख यांचे गुरुवार दिनांक २८-१२-२०१७ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- २७** **दिनांक : ३०/१२/२०१७**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर माळीवाडा येथील विशाल गणपती मंदिराच्या दक्षिणेकडील सि.स.नं. ४६८५/१/२ ही जागा विशाल गणपती मंदिर ट्रस्टला भाडे तत्वावर देणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ : १) मा.महापौर, अहमदनगर महानगरपालिका, यांची दिनांक १०/१०/२०१७ ची यादी.

अहमदनगर शहराचे आराध्य ग्रामदैवत असलेल्या माळीवाडा येथील विशाल गणपती मंदिराचे जिर्णोध्दाराचे काम पूर्णत्वास येत आहे. त्याअनुषंगाने या मंदिराच्या दक्षिण बाजुकडील महानगरपालिका मालकीची जागा मंदिर परिसरासाठी वापरास मिळणे बाबत झालेल्या कार्यवाहीचा अहवाल मा.महापौर महानगरपालिका यांनी संदर्भीत पत्रान्वये अपेक्षिलेला आहे. तसेच याबाबतची पुढील कार्यवाही शिघ्रगतीने करणे बाबत निर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने या कार्यालयाचा अहवाल पुढील प्रमाणे सादर करीत आहे.

१) विशाल गणपती मंदिराच्या दक्षिण बाजुकडील सि.स.नं.४६८५/१/२ ही जागा महानगरपालिकेच्या मालकीची असुन तीचे क्षेत्र २९६.१२ चौरस मिटर इतके आहे. या जागेवर मंजूर विकास योजना अहमदनगर मधील प्रस्तावाप्रमाणे भाजील मंडई हे आरक्षण होते.

२) त्यानंतर सन १९७६ ते १९७८ या सुमारास सदर जागेत भाजी मंडईचे बांधकाम करण्यात आले. तथापि या भाजी मंडईस योग्य तो प्रतिसाद मिळाला नाही.

३) सदर भाजी मंडईस योग्य तो प्रतिसाद न मिळाल्यामुळे व विशाल गणपती मंदिरासमोरील जागेत भक्तांची वरदळ वाढल्याने या भाजी मंडईमुळे विविध समस्या उभ्या राहील्या. त्यामुळे ही भाजी मंडई पाडण्याची मागणी होउ लागली.

४) वरिल प्रमाणे मागणी नंतर तत्कालीन नगरपालिकेने ही भाजी मंडई पाडुन टाकण्याची परवानगी शासनास मागीतली शासनाने पत्र क्र.एनयुएन/१०२०/२२४/प्र.क्र.१००/२००० दिनांक २१/०६/२००२ अन्वये सदर भाजी मंडई पाडण्यास खालील अटींवर परवानगी दिली.

**अटी :-**

अ) सदर भाजी मंडईच्या बांधकामास आलेला एकुण खर्च रु. १,७३,८६२/- इतका खर्च संबंधित विश्वस्त संस्थेकडुन वसुल करुन घ्यावा व त्यापैकी शासनाचे अनुदान रु.४३,३६८/- इतके शासनास परत करावे.

ब) भाजी मार्केटचा वापर पार्किंगसाठी करणे पुर्वी त्यासाठीचा रितसर प्रस्ताव शासनास पाठवुन शासनाची मान्यता घेण्यांत यावी.

क) पार्किंगसाठी रस्त्याचे आरेखन करतांना सक्षम नगररचना अधिकारी यांची मंजूरी घेण्यात यावी.

वरिलप्रमाणे शासनाचे पत्र प्राप्त झाल्यानंतर तत्कालीन नगरपरिषदेने ठराव क्रमांक १४ दिनांक २८/०५/२००४ अन्वये सदर जागा विशाल गणपती ट्रस्टला देणेबाबत खालील अटींवर मंजूरी दिली.

**अटी :-**

अ) शासनाने भाजी मार्केटच्या झालेल्या खर्चापोटी रु. १,७३,८६२/- इतकी रक्कम भरणे बाबत कळविले आहे. ही अट शिथील करणेचा प्रस्ताव शासनास पाठवावा.

ब) सदर जागेचा सध्या विद्यमान भाजी मार्केट हा वापर बदल करुन त्याऐवजी पार्किंगचे  आरक्षण करणे बाबत फेरबदल प्रस्ताव शासनाकडे सादर करावा.

क) पार्किंगसाठी रस्त्याचे आरेखन करतांना त्यास सक्षम नगररचना अधिकारी यांची मंजूरी घेण्यात यावी.

ड)संबंधित ट्रस्ट कडुन दरवर्षी नाममात्र रु.१००/- इतके भाडे वसुल करावे.

इ) सदर जागेचा वापर फक्त वाहन तळ म्हणुन करावा. त्यावर कोणतेही बांधकाम होणार नाही.

शासनाने अहमदनगर शहराची दुसरी सुधारीत विकास योजना २००५ मध्ये मंजूर केलेली आहे. तसेच ड वर्ग महानगरपालिकेसाठी विकास नियंत्रण नियमावली दिनांक २०/०९/२०१६ रोजी लागू केलेली आहे. या पार्श्र्वभुमीवर वरील अटींची फेरतपासणी करता व इतर अटींबाबत खालील प्रमाणे पुर्तता करुन घेवून माळीवाडा पंचमंडळ देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांना विषयांकित जागेपैकी मंजूर ठरावानुसार क्षेत्र २०९.०० चौरस मीटर इतकी जागा वाहन तळाच्या वापरासाठी देता येईल असे मत आहे.

ठराव क्रमांक १४ दिनांक २८/०५/२००४ मधील अटींबाबत खुलासा खालील प्रमाणे देत आहे.

अ) शासनाने भाजी मार्केटच्या झालेल्या खर्चापोटी १,७३,८६२/- इतकी रक्कम भरणे बाबत कळविले आहे. ही अट शिथील करण्याचा प्रस्ताव शासनास पाठवा.

**खुलासा -** उपरोक्त रक्कम रु.१,७३,८६२/- माळीवाडा पंचमंडळाने पावती क्रमांक ०९०४१७ दिनांक ०९/०९/२००८ अन्वये महानगरपालिकेत भरलेली आहे.

ब) सदर जागेचा सध्या विद्यमान भाजी मार्केट हा वापर बदल करुन त्या ऐवजी पार्किंगचे आरक्षण करणे बाबत फेरबदल प्रस्ताव शासनास सादर करावा.

**खुलासा -** तत्कालीन नगरपरिषदेने या बाबतचा फेरबदल प्रस्ताव शासनास सादर केलेला दिसुन येत नाही. तथापि अहमदनगर शहराच्या दुसरी सुधारीत मंजूर विकास योजनेतुन तरतुदी व नविन ड वर्ग महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदी नुसार सदर जागेत भाजी मंडईचा वापर होत नसल्याने आजुबाजुच्या झोननुसार सदर जागेचा वापर करता येईल. त्यामुळे शासनास फेरबदल प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता नाही.  असे मत आहे.  मात्र आजुबाजूच्या झोनींग नुसार सदर जागेवर फक्त वाहनतळ यासाठीच वापर करता येईल त्यावर कोणतेही बांधकाम करता येणार नाही. अशी स्पष्ट अट टाकणे आवश्यक आहे.

क) पार्किंगसाठी रस्त्याचे आरेखन करतांना त्यांस सक्षम नगररचना अधिकारी यांची मंजूरी घेण्यात यावी.

**खुलासा -** प्रस्तावित पार्किंगसाठी रस्त्याचे आरेखन नकाशा तयार केलेला असुन तो सोबत सादर करीत आहे.

ड) सि.स.नं.४६८५ /ब पैकी २०९.०० चौ.मी. या जागेपोटी संबंधित ट्रस्ट कडुन जागा भाडे पोटी दरवर्षी नाममात्र रु. १००/- इतके भाडे वसुल करावे.

**खुलासा -** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ ड नुसार अशी जागा नाममात्र भाडयाने देता येणार नाही. या जागेचे खालील प्रमाणे वाजवी भाडे विचारात घेवुन संबंधित संस्थेस जागा भाडयाने देणे योग्य होईल.

विशाल गणपती मंडळ ट्रस्टला मंजुर केलेल्या ठरावाप्रमाणे भाड्याने देण्यात येणारे क्षेत्र २०९.०० चौ.मी.

* मोकळया जागेचे क्षेत्र २०९.०० चौ.मी.

* जागेचा दर - (सन २०१७-२०१८ शिघ्र सिध्द गणकानुसासर भाग क्र.१/९०) रुपये १७२४०/- प्रती चौ.मी.
* जागेचे एकुण मुल्य = २०९.०० चौ.मी. x १७३४० = ३६,२४,०६०/- प्रती चौ.मी.
* जागेच्या एकुण मुल्याच्या ६% इतके परतावा विचारात घेतल्यास
* अपेक्षित वार्षिक भाडे रुपये = ३६,२४,०६०/- x ६% = २,१७,४४४/-
* जागा फक्त वाहनतळ या खुल्या वापरासाठी उपयोगात येणार असल्याने उपरोक्त अपेक्षित भाडयात ७०% इतकी घट देणे आवश्यक आहे. त्यानुसार घट धरुन खालील प्रमाणे वार्षिक भाडे येईल.
* वार्षिक भाडे - २,१७,४४४ x ३०% = ६५२३३/- (पासष्ट हजार दोनशे तेहेतीस मात्र) इतके वार्षिक भाडे संबंधित ट्रस्टला आकारुन सदर जागा भाडे कराराने देणे योग्य होईल.

सबब सदर प्रस्ताव पुढील मुजुरीसाठी मा.महासभेपुढे सादर करणे योग्य होईल.

यावर मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब यांचा अभिप्राय की, १) (ब) उपरोक्त (A) कडील तरतुदीसह चर्चा करावी. (२) ६% परतावा मूल्य आकारण्याची तरतूद दाखवा.

यावर सहाय्यक संचालक नगररचनाकार यांचेकडुन सादर की,

I) मुद्दा क्रमांक (१) बाबत मा.आयुक्त सो यांचेशी चर्चा झाली.

II) मुद्दा क्रमांक (२) च्या अनुषंगाने नमुद करण्यांत येते की, मिळकतीचे वार्षिक उत्पन्न ठरविताना परताव्यासाठी निश्चित दर काय असावा या बाबतीत स्पष्ट मार्गदर्शक सूचना नाहीत. वार्षिक परतावा Bank Interest; Rate of Inflation इ. बार्बीचा इरतो. सध्या असलेले Bank Interest इ. बाबी विचारात घेवून ६% इतका दर घेतलेला आहे तो योग्य वाटतो विषयांकित भूखंड फक्त खुल्या Parking वापरासाठी असल्याने ७०% घट दिलेली आहे. ती देखिल योग्य आहे. सबब वरील प्रस्ताव मंजुर करण्यास हरकत नाही व त्या प्रमाणे मा.महासभेस सादर करणे योग्य होईल. असे मत आहे.

यावर मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

---*---

चर्चा :-

विषय क्रमांक २७ चे वाचन :-

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** ऑफिस रिपोर्ट मध्ये टी.पी. ने जे रेट ठरवुन दिले त्याबद्दल माहिती द्यावी. रेट ठरवण्याचा सभागृहाचा अधिकार आहे.

**मा.श्री.सागर बोरुडे :-** एक रुपया नाममात्र भाडयाने देण्यात यावे ६५ गाळे रद्द करण्यात यावे. नगरचे ग्रामदैवत आहे.

**नगररचनाकार श्री.धोंगडे :-** वार्षिक भाडे ६५,२३३/- ठरले आहे.

**मा.श्री.दत्तात्रय कावरे :-** कायम करावे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** १ रुपये नाममात्र आकारावे.

**मा.श्री.संजय घुले :-** पार्किंग करीता देत आहोत पण मंदिरालगत जो सर्व्हीस रस्ता आहे त्याबाबत खुलासा करा. सर्व्हीस रस्ता सोडून जागा मंदिराला देण्यात यावी.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** १ रुपये नाममात्र आकारावे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** २९६ चौ.मी.जागा आहे २०९ चौ.मी. देतो उर्वरीत जागा का देत नाही.

**नगररचनाकार श्री.धोंगडे :-** रस्त्याकरीता राखुन ठेवली आहे. २० फुट व ६ मीटरचा रस्ता.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** ६ मीटरच्या रस्त्यावरुन अग्निशमनची गाडी जावू शकत नाही. किमान ९ मीटरचा रस्ता असणे गरजेचे आहे. दर्शन मंडप करण्याची परवानगी त्यांना द्या यापुर्वी दोन वेळा ठराव झाले आहेत. देतांना त्यांना बांधकाम करण्याची परवानगी द्या.

**नगररचनाकार श्री.धोंगडे :-** सि.स.नं.४६८५ ला महानगरपालिकेचे नाव पडले ही जागा रस्त्यापैकी नाही. मुळात ही जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे. रेकॉर्डला तशी नोंद आहे.

**मा.श्री.संजय घुले :-** मंदिराला जागा देण्यास आमचा विरोध नाही. ६ मीटर ते ९ मीटर रस्ता करावा.

**नगररचनाकार श्री.धोंगडे :-** भाडे कमी करता येईल. जागेचा वापर होणार नाही. खुली वापरता येणार. मुळ व्हॅल्युएशनला ७० टक्के घट देवून आकारणी केली आहे. भाडे कमी केलेले आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** १ रुपया नाममात्र किंवा १०००/- , २०००/- रुपये भाडे आकारुन द्या. बीपीएमसी ॲक्ट मधील कलम ७९ ड प्रमाणे कुठल्याही परिस्थितीत बाजारभावापेक्षा कमी दराने व्हॅल्युएशन आकारता येणार नाही. ऑडीट ऑब्जेक्शन भविष्यात येवू शकते.

**मा.श्री.सचिन जाधव :-** ही धोरणात्मक बाब आहे.

**नगररचनाकार श्री.धोंगडे :-** २०१४ मध्ये वार्षिक १००/- रुपये ने ठराव केला परंतू १००/- रु. भाडयाचा ठराव शासनाकडून मंजूर होवून आला नाही. ५ ते १० टक्के कमी करा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** वार्षिक भाडे ५० हजार रुपये करा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** आपल्या नकाशामध्ये तो रस्ता आहे का ?

**नगररचनाकार श्री.धोंगडे :-** नकाशात तो रस्ता नाही.

**मा.श्री.संजय घुले :-** त्या भागातील गल्लीत जाणा-या लोकांचे हाल होतील.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** आता खुली जागा राहणार आहे ट्रस्ट त्याची काळजी घेतील.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** सभागृहाने २५०००/- ठेवावे अशी माझी मागणी आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** किती वर्षासाठी देणार.

**नगररचनाकार श्री.धोंगडे :-** ३० वर्षासाठी मागे ठराव केला. महासभेला अधिकार आहे.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** ९९ वर्षाचा करार करा.

**नगररचनाकार श्री.धोंगडे :-** सभागृहाने १०% कमी करण्याचे रुलिंग द्यावे.

**मा.श्री.सुवेंद्र गांधी :-** १० % कमी केल्यानंतर ठराव विखंडीत होणार नाही का ?

**मा.महापौर मॅडम :-** गणपती मंदिराचा दक्षिण बाजुकडील ९९ वर्षाच्या करारानेच १०% भाडे कमी करुन जागा देण्यात येईल ट्रस्टने भविष्यात मागणी केल्यास बांधकाम परवानगी देण्यात यावी.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** भाजी मंडईचे आरक्षण रद्द करा. दुरुस्ती मागवा. पार्किंगच्या ठिकाणी बांधकाम करता येते.

**मा.श्री.सचिन जाधव :-** अगोदर ती जागा मंदिराला द्या मग पुढचे धोरण ठरवू.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** नागपुर महानगरपालिकेने LT ला १/- रु. नाममात्र दराने जागा दिली आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** २८/०५/२००४ रोजीचा ठरावातील ज्या बाबी नाकारल्या. (१) भाजी मार्केट खर्चापोटी १ लाख संबंधीत ट्रस्टने महानगरपालिकेकडे भरायचे ही अट शिथील. (२) पार्किंग फेरबदल. (३) पार्किंग रस्त्याने आरक्षण बदल करतांना सक्षम प्राधिकरणाची मंजूरी घ्यावी. (४) वाहनतळ म्हणून वापर करावा कोणतेही बांधकाम करु नये शासनाने ठराव विखंडीत केला.

**नगररचनाकार श्री.धोंगडे :-** विद्यमान कायद्यात बदल झाल्याने शासनाकडे पाठवण्याची गरज नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** महासभा ज्या पध्दतीने मंजूरी देईल कायद्यामध्ये बसेल त्या पध्दतीने शासनाकडे पाठवा. ठराव करतांना कायद्याप्रमाणे व एम.आर.टी.पी ॲक्टच्या नियम, अटी, शर्ती प्रमाणे कार्यवाही करा.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** ९९ वर्षाची सभागृहाची मागणी आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी ऑडीट पॅराचे ऑब्जेक्शनची पुर्तता आपण करतो का १०१ कोटीचा टीडीआर घोटाळा झाला.

**नगररचनाकार श्री.धोंगडे :-** आम्ही त्याचे स्पष्टीकरण दिले.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** १ रु.नाममात्र चा ठराव केला तर टीडीआर घोटाळयाप्रमाणे स्पष्टीकरण द्यावे लागेल.

**मा.श्री.सचिन जाधव :-** जे काही रितसर १० टक्के , १५ टक्के कमी करुन ९९ वर्षाचे कराराने देण्यात यावे.

**मा.महापौर मॅडम :-** रुलिंग दिले.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या सभागृहामधील चर्चेचा कल पाहता अहमदनगर माळीवाडा येथील विशाल गणपती मंदिराच्या दक्षिणेकडील सि.स.नं.४६८५/१/२ ही जागा विशाल गणपती मंदिर ट्रस्टला ९९ वर्षे मुदतीच्या कराराने देण्यास तसेच प्रस्तावात नमुद भाडयामध्ये १०% रक्कम कमी करुन भाडेतत्वावर देण्यास ही सभा मान्यता देत आहे. सदर जागा भाडयाने देण्याकरीता आवश्यक ती कार्यालयीन पूर्तता, भाडे, करारनामा आदी बाबत पुढील योग्य ती कार्यवाही प्रशासनाने पार पाडावी. ट्रस्टला भविष्यात सदर ठिकाणी बांधकाम परवानगी लागल्यास नियमानुसार कार्यवाही करावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.श्री.बाळासाहेब मारुती बोराटे,

अनुमोदक - मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- २८** **दिनांक : ३०/१२/२०१७.**

---

प्रस्तावाचा विषय :- वाहन वापर प्रतिपुर्ती योजनेमध्ये समाविष्ट करणे बाबत.

संदर्भ :- १) श्री.व्ही.जी.सोनटक्के,प्रभारी शहर अभियंता, २) श्री.काकडे एम.डी., पा.पु.विभाग प्रमुख, ३) श्री.आर.जी.मेहेत्रे प्रकल्प विभाग यांचा अर्ज.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) श्री.व्ही.जी.सोनटक्के,प्रभारी शहर अभियंता,
२)श्री.काकडे एम.डी., पा.पु.विभाग प्रमुख,
३) श्री.आर.जी.मेहेत्रे प्रकल्प विभाग यांचा अर्ज.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार सादर करण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेचे विषयांकित अधिकारी यांनी त्यांचे कामाचे स्वरुप नमूद करुन वाहन वापर प्रतिपूर्ती मिळणेकामी अर्ज सादर केलेले आहेत.

| **अ.क्र.** | **अधिका-यांचे नावे** | **कामाचे स्वरुप** |
|---|---|---|
| १ | श्री.व्ही.जी.सोनटक्के | प्र.शहर अभियंता म्हणून संपूर्ण शहरातील बांधकाम विभागा अंतर्गत होणा-या कामावर नियंत्रण ठेवणे व त्या अनुषंगाने संपूर्ण मनपा हद्दीमधील स्थळ पाहणी करणे करीता साईट इन्स्पेक्शन करणे तसेच झोन क्र.४ मधील पाणी पुरवठा वितरण व्यवस्था पाहणे. |
| २ | श्री.एम.डी.काकडे | संपूर्ण शहराचा पाणी पुरवठा विभाग प्रमुख म्हणून वितरण व्यवस्था पाहणे, देखभाल करणे, मुळानगर ते वसंतटेकडी दरम्यान मुख्य जलवाहिनीचे कामावर देखभाल व दुरुस्ती कामी नियंत्रण ठेवणे, नव्याने होत असलेल्या अमृत योजनेचे कामे पाहणे. |
| ३ | श्री.आर.जी.मेहेत्रे | पकल्प विभागाअंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना, रमया आवास योजना व झोपडपट्टी पुर्नविकास योजना राबविणे, स्वच्छ भारत अभियान राबविणे व घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत कचरा प्रक्रीया व विल्हेवाट यावर नियंत्रण ठेवणे. |

सद्यस्थितीत महानगरपालिका कडील अधिकारी/पदाधिकारी मिळून एकूण १७ प्रतिपूर्ती योजनेचा लाभ होत आहेत.

तथापि मा.अधिकारी/पदाधिकारी यांना शासन निर्णय क्र.वाहन/१००५/प्र.क्र.१३/२००५ विनियम मंत्रालय, मुंबई-३२ दि.२५/०५/२००५ चा आधार घेवून तसेच मा.स्थायी समिती, मा.महासभा मंजूर ठरावाचे अनुषंगाने प्रतिपूर्ती योजना अहमदनगर महानगरपालिकेमध्ये सुरु आहे परंतू याबाबत लेखा परीक्षणामध्ये आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.

परंतू संदर्भीय अधिका-यांचे अर्जानुसार तसेच त्यांचेकडील कामाचे स्वरुप पाहता त्यांना प्रतिपूर्ती योजनेत सामावून घेणेकामी मा.महासभेची मंजूरी आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविणे कामी मंजूरीस्तव सादर.

यावर मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम यांचा अभिप्राय की, मनपा अभियंते श्री.सोनटक्के, श्री.काकडे, श्री.मेहेत्रे यांचे मागणीनुसार त्यांना वाहन प्रतिपूर्ती योजना लागू करणे बाबत, प्रस्तावितनुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मुख्यलेखापरीक्षक श्री.खरात यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ नुसार मा.महासभेची मंजुरी घेणे आवश्यक तसेच लेखा परिक्षण आक्षेपा बाबत विभागाने विचार करावा. प्रभारी कामकाज सोपविण्यात अले असल्याचे नियमाप्रमाणे विभागाने खात्री करावी.

यावर उपायुक्त (कर) श्री.चव्हाण यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर अति.आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, उपरोक्त प्रस्तावित अ प्रमाणे मा.महासभेच्या मंजूरीकरीता सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेचा ठराव सोबत जोडावा.

यावर श्री.काकडे, श्री.मेहेत्रे, श्री.सोनटक्के यांचा अभिप्राय की, सादर ठराव सोबत जोडले आहेत.

यावर मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेकडे ठराव पाठवावा.

**चर्चा :-**

विषय क्रमांक २८ चे वाचन ऑफिस रिपोटर्चे वाचन करण्यात यावे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** आपण एकुण १७ अधिकारी पदाधिकारी यांना प्रतिपूर्तीचा ठराव करुन दिला त्याच्यावर लेखापरिक्षणात आक्षेप आला. सोनटक्के, मेहेत्रेंना घरकुल वगैरेच्या मिटींगना जावे लागते. प्रभाग अधिकारी काय काम करतात. आरोग्य अधिकारी याला गाडी घ्यायचे काय कारण. आस्थापना प्रमुख हे कुठे बाहेर जाणार महानगरपालिकेची आर्थिक परिस्थीती ठिक नाही. प्रभाग अधिकारी यांच्या गाड्या काढुन घ्या. आरोग्य अधिकारी काय करतो त्यांची गाडी पाहीली. एक प्रभाग अधिकारी माझ्या वॉर्डात राहतो तो मोटार सायकल वापरतो. इलेक्ट्रीक विभाग प्रमुखाला गाडी आहे. ते कुठे जातात. पाहणी करतात. मग भ्रष्टाचार झाला कसा. माझी विनंती यांच्या गाडयांना GPS सिस्टीम बसवा. इलेक्ट्रीक विभाग प्रमुख, आस्थापना प्रमुख, प्रभाग अधिकारी, आरोग्य अधिकारी यांना प्रतीपूर्ती देवू नये माझा विरोध नोंदवा. मेकॅनिकल इंजिनियर यांना विळदला जावे लागते.

**मा.श्रीमती.नसीम शेख :-** महिला व बालकल्याण समिती सभापती असून मी अडीच वर्षापासून कार्य रत होते. तरीसुध्दा मी प्रतीपुर्ती घेतली नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** एकुण १७ ची यादी वाचून दाखवा.

**मेकॅनिकल इंजि.श्री.निकम :-** वाहन प्रतिपूर्ती संदर्भात जे अधिकारी व पदाधिकारी प्रतीपुर्ती घेतात त्यांची नांवे वाचून दाखविली.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** दिनांक २५/०५/२००१ चा आधार घेवून लेखापरीक्षणात आक्षेप नोंदविलेला आहे. ऑफिस रिपोर्ट मध्येच जर आक्षेप नोदवला आहे. आयुक्तांना २५ लाखाचे मंजूरीचे अधिकार आहेत मग आमची मंजूरी का घेता. पेट्रोल भत्ता पगारात ॲड असतो. बाकीच्या अधिका-यांना देता येत नाही. शाकीर शेख यांच्या पत्रावर शासनाकडे अहवाल पाठवला का.

**मेकॅनिकल इंजि.श्री.निकम :-** GR २००३ चे आधारे योजना लागू केली १२-१३ लेखापरिक्षणाचे आक्षेपाचे उत्तर आपण सादर केले. स्थायी समिती विषय क्र.८० अन्वये दिनांक २३/१०/२०१३ विषय क्रमांक २३ अन्वये ऑडीट पॅराचा मुद्याबाबत ठराव आपण पारीत केला. सन २०१२-२०१३ चा आक्षेप नील झाला. सन २०१३-२०१४ चे आक्षेपाचे उत्तर आपण दिले पण अजुन त्यांचे उत्तर आलेले नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** महानगरपालिकेची अत्यंत दुर्देवी परिस्थिती आहे. नगरसेवक निधीचे काम होत नाही. प्रत्येक मोठया कामासाठी पीएमसी नेमता GR मध्ये वाहन भत्त्याची तरतुद आहे. लेखापरीक्षणात उत्तर येत नाही. BPMC ॲक्ट कायद्याप्रमाणे त्यांना प्रतीपुर्ती देण्यात येते. त्यांनाच देण्यात यावी. तथापि माझा त्यास विरोध नोंदवा. लेखा परीक्षणात भविष्यात आक्षेप आल्यास मी जबाबदार रहाणार नाही. राउत नावाचे मनपाचे कर्मचारी देणे मिळण्यासाठी हायकोर्टात गेले. असून हायकोर्टाने त्यांचे देणे-घेणे बाबत महानगरपालिकेला आदेश दिले आहेत. पैशाकरीता कर्मचा-यांना हायकोर्टात जावे लागते. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती ठीक नाही. ६८ प्रभागा मध्ये फक्त दोनच इंजिनियर आहेत. कोणीही कुठे जात नाही. नाक्याच्या बाहेर गेले तर त्यांना टीएडीए देण्यांत यावे. एकालाही प्रतीपुर्ती देवू नये. रिकव्हरी जर निघाली तर आम्ही जबाबदार रहाणार नाही. आयुक्तांकडे ग्रॅज्युएटी, पेन्शन प्रॉव्हेडंड फंड बाबत मोर्चे येतात तरी हा विषय मंजूरीसाठी सादर केला आहे. दिनांक ०१/०१/२०१७ पासून सर्व प्रतीपुर्ती बंद करण्यात यावी.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** आमचाही विरोध नोंदवा.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** महापौर, उपमहापौर, आयुक्त, उपायुक्त कायद्यामध्ये त्यांना देण्याचे अधिकार आहेत. त्यांना देण्यात यावे. अनिल शिंदे यांना ५ ते ७ लाख रुपये रिकव्हरीचे देणे-घेणे बाबत पत्र आले आहे.

**मा.सौ.मालन ढोणे :-** रिकव्हरी झाली तरी आम्ही जबाबदार रहाणार नाही. आमचे मानधन द्यायला पैसे नाहीत. आमचा विरोध नोंदवा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** माझी पत्नी महापौर पदावर कार्यरत असतांना वाहन प्रतिपूर्ती बाबत महापौरांवर देखील रिकव्हरी आली आहे. हे मी याठिकाणी निदर्शनास आणून देतो.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** टीएडीएची तरतुद चव्हाण साहेबांनी नमुद केली टीएडीए ची पण तरतुद करता आली तर प्रशासनाने तरतुद करावी.

**मा.श्री.अभय आगरकर :-** संविधानिक पदे आहेत त्यांना प्रतीपुर्ती दिलीच पाहिजे. शासनाने जरी नियम दिले आहेत परंतु आणखी व्यक्ती आहेत त्यांना अचानक एखाद्या ठिकाणी जावे लागते. पाणी पुरवठा विभागाची पाईप लाईन फुटली ज्या अधिका-यावर जबाबदारी आहे. त्याने ती सक्षमपणे पार पाडली पाहीजे. याची बिगा-यावर जबाबदारी आहे. त्याने ती सक्षमपणे बजावली पाहीजे. कायद्यातील तरतुदीचा आधार घेवून याबाबत कारवाई करावी. जनतेशी निगडीत प्रश्न आहे. एखाद्या ठिकाणी आग लागू शकते. त्यांना आवश्यक आहे त्याअधिकारी यांना प्रतिपुर्ती देण्यांत यावी. संबंधित कायद्यानुसार तुम्ही प्रतीपूर्ती देणार, आग लागल्यानंतर सर्व अधिका-यांना बोलावून घ्यावे लागते. प्रॅक्टीकली तुम्ही पहा. व्यवहारीक दृष्टीकोनातुन पहा. सुविधा अभावी जर एखादी मोठी घटना घडणार असेल अशा वेळी गरज पाहून निर्णय घ्या. कुठल्याही प्रकारे ऑडीट ऑब्जेक्शन येणार नाही त्याप्रमाणे विचार करुन निर्णय घ्यावा.

**मा.सभागृह नेते श्री.उमेश कवडे :-** ज्या अधिका-यांना वाहनाची आवश्यकता आहे. अशा अधिका-यांना वाहन प्रतिपुर्ती योजना देण्यास हरकत नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** लेखापरिक्षणाला डावलून आपण काम करत असाल तर माझा विरोध नोंदवा. महानगरपालिकेच्या मालकीच्या किती गाड्या आहेत.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** ४ गाड्या आहेत.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** मुंबईचे क्षेत्र २२५ कि.मी.चे आहे. नगरचे क्षेत्र तेवढे नाही. आग लागली तर फायर फायटर आहे. लेखा परीक्षणात आक्षेप असताना असा विषय घेता येतो का. आयुक्तांनी खुलासा करावा.

**मा.महापौर मॅडम :-** मा.आयुक्त, उपायुक्त, काकडे, मेहेत्रे, सोनटक्के, यांचा समावेश बाकी संबंधित अधिकारी सांविधानिक पद आहेत. त्यांना प्रतीपुर्ती देण्यात यावी.

**मेकॅनिकल इंजि.श्री.निकम :-** लेखा परीक्षणाचा आक्षेपा संदर्भात महानगरपालिकेचा ठराव ५/०८/२०१४ चा ठराव झालेला आहे. यात अधिकारी व पदाधिकारी यांची नांवे नमुद केली आहेत. लेखापरीक्षण आक्षेपास उत्तर दिलेले आहे. आजही वाहन प्रतीपुर्ती देतांना दर महिन्याला प्रतीपुर्ती घेणाराकडून आम्ही भविष्यात लेखापरीक्षणात रक्कम निघाल्यास आम्ही रक्कम भरण्यास तयार आहोत असे लेखी घेण्यात येते.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** २०१४ ला महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली होती.

**मा.महापौर मॅडम :-** पुढचा विषय वाचा.

---*---

**ठराव :-**

अहमदनगर महानगरपालिकेच्या सभागृहामधील चर्चेचा कल पाहता येथुन पुढे वाहन वापर प्रतिपुर्ती योजना महानगरपालिकेच्या पदाधिकारी यांचेसह संविधानिक अधिकारी पदी असलेले अधिकारी अनुक्रमे आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त सामान्य/कर, सहाय्यक आयुक्त, शहर अभियंता, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, नगरसचिव, मुख्यलेखापरीक्षक यांचेसह मुख्यलेखाधिकारी, पाणीपुरवठा ही अत्यावश्यक सेवा असल्याने मेकॅनिकल इंजिनियर व पाणी पुरवठा विभाग प्रमुख, प्रकल्प विभाग प्रमुख, अतिक्रमण निर्मुलन विभाग प्रमुख , आरोग्य अधिकारी , सर्व प्रभाग अधिकारी यांनाही लागू करणेस व चालू ठेवणेस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

तसेच मा.सौ.छायाताई सुरेश तिवारी, नगरसेविका यांचे पत्रानुसार लोखंडी पुलाशेजारील नविन पुलाचे कामाकरीता निधीची आवश्यकता असल्याने नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्राप्त निधीवर सन २०१४-२०१५ व सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात झालेले व्याज रक्कम रु.६८,४९,६०७/- व ८१,६९,४७७/- असे एकुण रुपये १,५०,१९,०८४/- इतकी रक्कम पुलाचे कामासाठी वापरल्यास काम लवकर होण्यास मदत होईल. सदर व्याजाची रक्कम पुल बांधणेसाठी वापरणेकामी मा.जिल्हाधिकारी ,अहमदनगर यांचेकडेस परवानगी साठी सदर प्रस्ताव पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.श्री.उमेश खंडेराव कवडे,

अनुमोदक - मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-<br>
महापौर,<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- २९** **दिनांक : ३०/१२/२०१७.**

---

प्रस्तावाचा विषय :- दै.लोकमत या वृत्तपत्रातून प्रसिध्द केलेल्या जाहिरातींच्या दि.१२/०१/२०१५ ते ०३/०५/२०१५ या कालावधीतील बीलांबाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विनंतीपूर्वक रिपोर्ट सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या जाहिराती प्रसिध्दी विभागामार्फत शासनमान्य यादीवरील वृत्तपत्रांमध्ये रोटेशननुसार प्रसिध्द करण्यात येतात. दैनिक लोकमत या वृत्तपत्रातून दि.१२-१-२०१५ ते ३-५-२०१५ अखेर एकूण ५ जाहीरातींची बीले जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी दिलेल्या रिलीज ऑर्डरच्या प्रती बीलासोबत जोडलेल्या नसल्यामुळे सदर आर्थिक वर्षातून अदा करता आलेली नाहीत.

सदरबाबत संबंधीत वृत्तपत्रांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानुसार वरीलप्रमाणे ५ बीले चालू आर्थिक वर्षातून खर्ची टाकणेकरिता लेखापरिक्षणासाठी पाठविले असता मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी " महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता १९७१ मधील नियम ४४ (३) अन्वये सक्षम प्राधिकरणाची. मा.महासभा मंजूरी घेणे आवश्यक राहील " असा अभिप्राय दिला आहे. त्यानुसार सदरची बीले अदा करणेस मा.महासभेची मंजूरी मिळणेकरिता मा.महासभेपुढें सादर करण्याच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर प्रसिध्दी अधिकारी श्री.वैद्य यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मा.महासभेची मंजूरी मिळणेकरीता मा.महासभेपुढे सादर करण्याच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर उपायुक्त (कर) श्री.चव्हाण यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब यांचा अभिप्राय की, कृ. चर्चा करा (अ बाबत)

यावर मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब यांचा अभिप्राय की, चर्चा केली. मान्य

अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रसिध्दी विभागामार्फत दैनिक लोकमत या दैनिकातून प्रसिध्दीस दिलेल्या जाहिरातींची विषयसुची खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | बील क्रमांक | दिनांक | विषय | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १३८० | १२-१-२०१५ | मनपा सां.बां.विभाग मा.आमदार निधी अंतर्गत ई निविदा क्र.७९०, ७९१, ७९३ व ७९४ सन २०१४-१५ प्रथम मुदतवाढबाबतची सुचना | २४८४/- |
| २ | ९८७० | ९-४-२०१५ | मनपा पाणीपुरवठा विभाग ई निविदा क्र.८९२ सन २०१४-१५ ची सुचना | १४००/- |
| ३ | ९९७३ | ९-४-२०१५ | मनपा पाणीपुरवठा विभाग ई निविदा क्र.८९६ सन २०१५-१६ ची सुचना | १६००/- |
| ४ | १०८९२ | २०-४-२०१५ | मनपा स्पर्धा परिक्षा केंद्र सावेडी बॅच क्र.९ प्रवेश परिक्षाबाबत | १६००/- |
| ५ | १२१०७ | ३-५-२०१५ | कै.बा.दे.दवाखान्याकरिता बंदूकधारी व साधा सुरक्षा रक्षक नेमणेकामी जाहिर निविदा नोटीस | ४८००/- |
| | | | एकूण - | ११८८४/- |

उपरोक्त जाहिराती वेळोवेळी मा.उपायुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांच्या खर्चास दिलेल्या मंजुरीने देण्यात आलेल्या आहेत. सदर जाहिरातींची बीले शासकीय दराने प्राप्त झालेली आहेत. तरी सदर बीले जाहिरात खर्च (रु.२१,००,०००/-) या लेखाशिर्षकातून खर्ची घालण्यास व रु.११८८४/- (अक्षरी रुपये अकरा हजार आठशे चौ-याऐंशी फक्त) संबंधीतास अदा होण्यास रिपोर्ट सादर.

चर्चा :-

**मा.महापौर मॅडम :-** ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**प्रसिध्दी अधिकारी श्री.वैद्य :-** ब-याच वर्तमानपत्रांची ३० लाखांची बिले केली आहेत.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ती ही मंजूर करण्यांत यावी.

**मा.महापौर मॅडम :-** ऑफिस रिपार्ट मंजूर. इतर वर्तमान पत्रांची अशी बिले असतील तर त्या वर्तमान पत्रांची बीले देखील अदा करण्यात यावी. पुढील विषय घ्या.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. दै.लोकमत या वृत्तपत्रातून प्रसिध्द केलेल्या जाहिरातींच्या दि.१२/०१/२०१५ ते ०३/०५/२०१५ या कालावधीतील बील रक्कम रु.११,८८४/- (रक्कम रुपये आकरा हजार आठशे चौ-याऐंशी मात्र) अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच इतर वर्तमान पत्राचे जाहीरातींची बीले असतील तर ते देखिल अदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.श्री.बाळासाहेब मारुती बोराटे,

अनुमोदक - मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ३०** **दिनांक : ३०/१२/२०१७.**

---

प्रस्तावाचा विषय :- सन २०१६-२०१७ दिवाळी सणानिमित्त महानगरपालिकेमधील पात्र कायम कर्मचा-यांच्या सानुग्रह अनुदाना बाबत झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ : १) मनपा कामगार युनियन यांचे कडील जा.क्र. १२/ श्रमिक /२०१७ दिनांक ०३/०८/२०१७ रोजीची संप नोटीस.

२) मा.सहाय्यक कामगार आयुक्त,अहमदनगर यांचे दि.३/८/२०१७ चे पत्र.

३) दिनांक ५/१०/२०१७ रोजी मा. पदाधिकारी,अधिकारी, व कामगार युनियन प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक सभावृतांत.

४) मा.औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ च्या कलम १२(३) अन्वये मा.पदाधिकारी, अधिकारी व कामगार युनियन प्रतिनिधी यांचेमध्ये झालेला करारनामा.

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी त्यांचेकडील जा.क्र. १२ / श्रमिक / २०१७ दि.०३/०८/२०१७ अन्वये औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ च्या कलम २२ (१) नुसार संप नोटीस देवुन परिशिष्टातील मागण्यांसाठी अहमदनगर महानगरपालिकेवमधील सर्व कामगार दि.२१/०८/२०१७ पासुन संपावर जातील असे नमुद करुन संप नोटासामध्ये खालील प्रमाणे परिशिष्टामध्ये मागण्या केलेल्या होत्या.

१) दि.१९ ऑक्टोबर २०१७ रोजी दिवाळी सण असल्याने महानगरपालिकेतील सर्व कामगारांना सन सन २०१६ - २०१७ या सालासाठी त्यांच्या सर्व भत्त्यासह होणा-या वार्षिक मिळकतीच्या २० % बोनस म्हणुन दिवाळी सणापुर्वी अदा करण्यात यावा.

२) महानगरपालिकेतील सर्व कामगारांना दिवाळी सणासाठी सानुग्रह अनुदानापोटी रक्कम रु. २०,०००/- (अक्षरी रु.वीस हजार मात्र) दिवाळीपुर्वी विनाअट देण्यात यावी.

संदर्भिय क्रं. २ च्या पत्रान्वये मा. सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर यांनी दि.०३/०८/२०१७ रोजी पत्र देवुन विषयांकित बाबत दि.१८/०८/२०१७ रोजी उपस्थित राहण्याबाबत निर्देशित केलेले होते.

उपरोक्त मागणी संप नोटीस व संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी सदरची बाब ही अर्थिक व धोरणात्मक स्वरुपाची असल्याने जा.क्र.आस्था.१९०३ दि.१६/०८/२०१७, २३१३ दि.१८/०९/२०१७, २४०४ दि.२७/०९/२०१७ च्या पत्रान्वये मनपा प्रशासन,व कामगार युनियन पदाधिकारी,प्रतिनिधी यांची वेळोवेळी संयुक्त बैठका आयोजित करण्यात आलेल्या होत्या. तथापि विषयांकित मागण्याबाबत निर्णय झालेला नसल्याने मा.महापौर,अहमदनगर महानगरपालिका यांचे कडील जा.क्र. ५६२ दि.०४/१०/२०१७ अन्वयेच्या पत्राच्या अनुषंगाने मनपा कर्मचा-यांच्या सानुग्रह अनुदान मागण्यांबाबत मा. पदाधिकारी,अधिकारी, कर्मचारी युनियन पदाधिकारी, प्रतिनिधी यांची दि.०५/१०/२०१७ रोजी संयुक्त बैठक आयोजित होवुन सन २०१६ - २०१७ करीता मनपा कायम कर्मचा-यांना रु. ६,०००/- सानुग्रह अनुदान अदा बाबत निर्णय होवुन मा.औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ च्या कलम १२(३) अन्वये मा.पदाधिकारी, अधिकारी व कामगार युनियन प्रतिनिधी यांचेमध्ये खालील प्रमाणे नमुद केल्यानुसार शर्तीवर व अटीवर करारनामा करण्यात आलेला आहे. ( सोबत : करारनामा छायंकित प्रत. पानं. ४९ )

## -: कराराच्या अटी व शर्ती :-

**१.** सन २०१६-२०१७ करिता दिवाळी सणासाठी करारापुर्वी म्हणजे दि.६/१०/२०१७ पर्यंत महानगरपालिकेच्या कायमसेवेत असणा-या प्रत्येक पात्र कामगार कर्मचा-यास (परिविक्षाधीन व सन २०१६-२०१७ या अर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांसह व प्रातिनियुक्तिवरील कर्मचारी यांचे सह) विनाअट एकरकमी प्रत्येकी रुपये ६०००/- (अक्षरी रुपये सहा हजार मात्र ) सानुग्रह अनुदान म्हणुन देण्यात येतील.

**२.** सन २०१६-२०१७ या आर्थिकवर्षात सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना तो कार्यरत असलेल्या कालावधी पर्यंतचेच सानुग्रह अनुदान देय राहील.

**३.** महाराष्ट्र शासनाने बोनस म्हणुन सन २०१६-२०१७ सालासाठी देण्याचे ठरविले किंवा सानुग्रह अनुदानाबाबत शासनाचा आक्षेप आला तर त्याबाबत युनियनशी चर्चा करुन याबाबत निर्णय घेण्यात येईल.

**४.** वरील अट ही दि. ३/८/२०१७ रोजीच्या संप नोटीशीमधील परिशिष्टामध्ये नमूद सर्व मागण्यांबाबत अंतीम करार आहे. असे समजण्यात येईल, सदर करार हा सन २०१६-२०१७साठी असुन तो पुढील काळात बंधनकारक रहाणार नाही.

**५.** हा करार महानगरपालिकेतील सर्व कार्यरत व सेवानिवृत्त कामगार कर्मचा-यांवर बंधनकारक राहील.

**६.** या कराराचा लाभ घेणा-या प्रत्येक कामगार कर्मचा-यास या सानुग्रह अनुदानातुन प्रत्येकी रू.२००/- युनियन निधी म्हणुन कपात करण्यांत येईल व ही रक्कम युनियनला धनादेशाचे स्वरूपात देण्यांत येईल. या कपातीबाबत भविष्यात वाद निर्माण झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी कर्मचारी युनियनची राहिल.

वरील झालेल्या करारानाम्यामध्ये सदर करारास मा. महासभेच्या कार्योत्तर मंजुरीच्या अधिन राहुन उभयपक्षी मंजुरी देण्यात आलेली असले बाबत नमुद केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०१७ - २०१८ चे लेखाशिर्षकामध्ये पान नं. २२ वरील अनु.क्रं. ४१ नुसार कर्मचारी सानुग्रह अनुदानापोटी रक्कम रुपये १ कोटी ५० लाख इतकी अंदाजपत्रकामध्ये तरतुद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

दिनांक ०५/१०/२०१७ रोजीच्या संयुक्त बैठकीमधील निर्णय व मा.पदाधिकारी, अधिकारी व कामगार युनियन प्रतिनिधी यांचेमध्ये झालेल्या शर्ती व अटीनुसार कराराप्रमाणे मनपामधील पात्र कायम कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित प्रत्येकी रुपये ६,०००/- याप्रमाणे सानुग्रह अनुदान माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये अदायगी करण्यात आलेली असुन त्याकामी एकुण रुपये १,१९,८३,०००/- ( एकुण रुपये एक कोटी एकोणीस लाख त्र्याऐंशी हजार मात्र) इतका खर्च झालेला आहे.

तरी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने मा.औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ च्या कलम १२(३) अन्वये मा.पदाधिकारी,अधिकारी व कामगार युनियन प्रतिनिधी यांचेमध्ये झालेल्या कराराचनामास व त्यानुषंगाने सन २०१६ - २०१७ करीता दिवाळी सणानिमित्त मनपामधील कायम पात्र कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान प्रत्येकी रु. ६,०००/- याप्रमाणे अदायगी झालेल्या खर्चास मा.महासभेची कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता विषय महासभेकडे मंजुरीकामी पाठविणेस मान्यता असावी.

यावर उपायुक्त (सा) श्री.दराडे यांचा अभिप्राय की, कार्योत्तर मंजुरीसाठी महासभेकडे पाठवणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :-**

**मा.महापौर मॅडम :-** प्रस्ताव क्रमांक ३० ऑफिस रिपार्ट मंजूर.

--*--

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. सन २०१६-२०१७ दिवाळी सणानिमित्त महानगरपालिकेमधील पात्र कायम कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान बाबत झालेल्या करारनाम्यास व त्याप्रमाणे प्रत्येकी रु.६,०००/- इतक्या अदायगी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.श्री.बाळासाहेब मारुती बोराटे,

अनुमोदक - मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ३१** **दिनांक : ०३/०१/२०१८.**

---

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान (National Urban Livelihoods Mission) अंतर्गत शहरी उपजिविका केंद्रचा प्रस्ताव मंजुरी बाबत..

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) मा.नगरविकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक एनयुएल-२०१४/प्र.क्र.१०४/नवि-३३ दिनांक २८/०८/२०१४

२) मा.आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी मुंबई यांचे दिनांक /२०१७ रोजीचे पत्र क्र.

३) नगपरिषद संचालनालय, राज्य अभियान व्यवस्थापक, सामाजिक अभिसरण व संस्था बांधनी यांचे दिनांक ०१/०३/२०१७ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन, मा.शासनाच्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिके मार्फत दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान शहरात राबविले जाते. सदर अभियानांतर्गत सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी या उपांगांतर्गत संदर्भीय शासन निर्णयानुसार शहरामध्ये शहरी उपजिविका केंद्र (City Livelihoods Centre) तयार करावयाचे आहे. तरी उपजिविका केंद्राचा प्रस्ताव तयार करुन मंजुरीसाठी मा.नगरपरिषद प्रशासन संचलनालय यांचे अंतिम मंजुरीनंतरच शहरात किमान १ उपजिविका केंद्रउभारणी करणे बाबत सुचित करण्यात आलेले आहे. शहराच्या लोकसंख्ये नुसार १ पेक्षा जास्त शहरी उपजिविका केंद्र (City Livelihoods Centre) केंद्राची उभारणी करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

संदर्भीय पत्र क्र.३ नुसार शहरी उपजिविका केंद्र (City Livelihoods Centre) केंद्र उभारणी करणे बाबत पुन्हा सुचना प्राप्त झालेल्या आहेत. तरी शहरी उपजिविका केंद्र शहरात पुढील ठिकाणी १.प्रोफेसर कॉलनी शॉपिंग सेंटर गाळ क्र.३२ सावेडी व २) राष्ट्र संत श्री आनंद ऋषीजी व्यापारी संकुल, अग्निशमन दला शेजारी या दोन ठिकाणी स्थापण्यास दिनांक १८/०५/२०१५ रोजी मा.आयुक्त साहेब यांनी मंजुरी दिलेली आहे. (मंजुर टिप्पणी पृ.क्र.८१/प ते ८३ प वर अवलोकनार्थ सादर)

सदर शहरी उपजिविका केंद्रचा सविस्तर प्रकल्प अहवाल DAY-NULM कक्षाकडून तयार करण्यांत आलेला आहे. सदर सविस्तर प्रकल्प अहवालाची प्रारुप प्रत मान्यतेस्तव व स्वाक्षरीस्तव सविनय सादर. तसेच सविस्तर प्रकल्प अहवालास मा.सर्व साधारण सभेची मंजुरी घेवुन अंतिम मान्यतेकरीता मा.नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे कडे सादर करण्याकरीता सविनय सादर. " अ "

यावर मा.उपायुक्त श्री.बेहेरे सो यांचा अभिप्राय की, त्रिदल इमारती शेजारी जुने STSRY चे विक्री केंद्र आहे तेथे यासाठी ---- असे मत आहे. मे आदेशार्थ सादर.

यावर मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे सो यांचा अभिप्राय की, अ नुसार मान्यतेस्तव मा.महासभेकडे प्रस्ताव सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे सो यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

चर्चा :-

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** आपण तिथे काय करणार.

**एन.यु.एल.एम.श्री. शिंदे :-** महिला बचत गटानी तयार केलेल्या वस्तु, स्कील, प्रशिक्षण देणा-यांकडून तयार होणा-या वस्तू त्या ठिकाणी विक्रीसाठी ठेवणार आहोत. एक समिती स्थापन करुन धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी करण्यांत येईल. समिती स्थापन करण्यासंदर्भात शासनाने डायरेक्शन दिले.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** तुम्ही मानधनावर कर्मचारी आहेत त्यांचे स्वाक्षरीने प्रस्ताव सादर करण्यात येतील. मानधनावरील कर्मचा-यांकडे तशी जबाबदारी कशी सोपवता.

**उपायुक्त श्री.दराडे :-** एनयुएलएम शासन नगरविकास यांचेकडून संबंधीत अधिका-यांची नियुक्ती झाली आहे. उपायुक्त कर यांचे मार्फत प्रस्ताव ठेवणेत आला आहे. त्यांचे स्पष्टीकरण घेवून घेण्यास हरकत नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** कायद्याप्रमाणे मंजूरी देण्यांत यावी.

**उपायुक्त श्री.दराडे :-** चव्हाण साहेबांकडे चार्ज असतांना प्रस्ताव आलेला आहे. मला याबाबत माहिती नाही.

**एन.यु.एल.एम.श्री. शिंदे :-** १२० बचत गटांना फिरता निधी वाटप केले. ४२१ बचतगट स्थापन केले आहेत. महिला बचतगट हा दारिद्र्य रेषेखाली ७०% व ३०% above महिला असतात या योजनांचा उद्देश संस्थेची क्षमता बांधणी करणे आपल्या शहरात ११ फेडरल संघ आहे. त्यांना ५० हजार फिरता निधी देतो. CLCC पूर्वी सुजरोयो मार्च ९७ मध्ये रुपांतर एन.यु.एल.एम.मध्ये झाले आहे. मा.प्रधानमंत्री यांचे स्कील डेव्हलपमेंट प्रोग्राम प्रमाणे वेगवेगळे तरुण यांना रोजगाराची आवश्यकता आहे. त्यांना वेगवेगळया प्रोग्राम मार्फत प्रशिक्षण दिले जाते.

**अति.आयुक्त श्री.वालगुडे साहेब :-** पूर्वी ने.रो.यो. होती व आता त्याऐवजी एन.यु.एल.एम.ही योजना शासन राबवत आहे. या बाबतचा निधी शासनाकडून मिळणार आहे.

**मा.महापौर मॅडम :-** सर्व महिला सदस्यांना याची माहिती देण्यात यावी विषय ३१ ऑफिस रिपोर्ट मंजूर.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान (National Urban Livelihoods Mission) अंतर्गत शहरी उपजिविका केंद्र शहरात प्रोफेसर कॉलनी शॉपिंग सेंटर गाळा क्र.३२ सावेडी व राष्ट्रसंत श्री आनंद ऋषीजी व्यापारी संकुल, अग्निशमन दला शेजारील आधारकेंद्र तसेच बचत गटाच्या महिलांना सोयीचे होईल त्यादृष्टीने महानगरपालिकेच्या जागा किंवा गाळा उपलब्ध होत असेल तर अशा ठिकाणी स्थापण्याच्या प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे. सदर प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविण्यात यावे.

नियमानुसार पुढील उचित कार्यवाही प्रशासनाने करण्यात यावी.

सूचक - मा.श्री.बाळासाहेब मारुती बोराटे,

अनुमोदक - मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ३२** **दिनांक : ३०/१२/२०१७.**

---

प्रस्तावाचा विषय :- महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदास मंजुरी मिळणे बाबत

संदर्भ - १) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,शासन निर्णय क्र.नमाशा २००९ (४९७/०९) माशि-१ दिनांक ११ जुन २००९,

२) महाराष्ट्र क्रमांक-नमाशा-२००९ (४९७/०९) माशि-१ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग दिनांक १८ जुलै २००९,

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ - १) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,शासन निर्णय क्र.नमाशा २००९ (४९७/०९) माशि-१ दिनांक ११ जुन २००९,

२) महाराष्ट्र क्रमांक-नमाशा-२००९ (४९७/०९) माशि-१ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग दिनांक १८ जुलै २००९,

३) मा.सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडील जा.क्र. कार्या.क्र-१ आस्थापना विभाग दिनांक १०/०७/२०१७ चे पत्र.

४) मा.सभापती स्थायी समिती, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडील दिनांक २६/०९/२०१७ रोजी झालेल्या सभेतील ठराव.

अहमदनगर महानगरपालिका मा.स्थायी समिती विषय क्रमांक ४९ दिनांक २६/०९/२०१७ रोजी सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदास मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत आलेला असल्याने, तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१ नुसार प्रस्तुत कार्यवाहीस धोरणात्मक बाब असल्याने मा.महासभेची मंजूरी घेणे बाबत संबंधित विभागास आदेश झालेले आहे. अहमदनगर महानगरपालिका माध्यमिक विद्यालय हे अहमदनगर महानगरपालिका संचलित असून शासन मान्य आहे. माध्यमिक विद्यालयासाठी शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे पद निर्मितीस व नियमानुसार कार्यवाहीस मान्यता दिल्यास सदर प्रस्ताव मे.शासन मंजूरीसाठी पाठवावा लागेल संदर्भ क्र.१ व २ शालेय शिक्षण क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. नमाशा २००९ (१९७ / ०९) माशि-१ दिनांक ११ जून २००९ व १८ जुलै २००९ च्या शासन निर्णयाचे अवलोकन केले असता अहमदनगर महानगरपालिका माध्यमिक विद्यालय हे अहमदनगर महानगरपालिका संचलित असल्याने सदर कर्मचारी अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभागाचे आस्थापनेवर येणार असल्याने सदर प्रस्ताव मा.आस्थापना विभाग प्रमुख मनपा यांचे मार्फत मा.महासभेच्या व शासनाच्या मंजूरीसाठी सादर करणे बाबत आदेशार्थ सविनय सादर.

यावर श्री.पठाण सर यांचा अभिप्राय की, मा.प्रशासन अधिकारी साहेब, प्रस्तावित नुसार आदेशार्थ सविनय सादर.

यावर उपायुक्त (कर) श्री.चव्हाण साहेब यांचा अभिप्राय की, EST मार्फत पुढील कार्यवाही करावी.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, आस्थापना विभाग अ प्रमाणे प्रस्ताव सादर करावा.

यावर शिक्षण विभाग जा.क्र.शिक्षण/३८७ दिनांक १४/११/२०१७ अन्वये फेरसादर रिपोर्ट की,

टि.पा.क्र.७ ते १९ नुसार विषयांकित प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे मंजूरीस्तव पाठविण्यात आला होता. मा.स्थायी समिती ठराव९ क्रमांक ४९ दिनांक २६/०९/२०१७ अन्वये मा.महासभेची मंजूरी घेणे बाबत निर्देश आहेत. त्यानुसार धोरणात्मक बाब असल्याने मा.महासभेपुढे निर्णयास्तव पाठविणेस हरकत नाही.

यावर उपायुक्त (सा) श्री.दराडे यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :-**

**मा.श्री.दिप चव्हाण :-** आपल्याकडे प्राथमिक शाळा आहे. आणि मागणी माध्यमिकची करतात. आस्थापना सूचीवर हे पद रिक्त आहे. प्राथमिक वाले माध्यमिकचा प्रस्ताव कसा करतात. हा विषय न्याय प्रविष्ठ असतांना हा विषय घेता येतो का २२६ खाली तुम्ही ॲफिडेव्हीट लिहून दिले मी दुस-या प्राधिकरणाकडे या विषयी दाद मागणार नाही. हा विषय रद्द करा. हायकोर्टाचा निकाल लागल्यानंतर हा विषय घेण्यात यावा.

**उपायुक्त श्री.दराडे :-** संदर्भीय विषय हा स्थायी समिती कडून मंजूर आहे. आपल्या आस्थापना स्टॅपिंग पॅटर्न मध्ये माध्यमिक शिक्षकांच्या जागा मंजूर आहेत. मा.उच्च न्यायालयाने संबंधीत जागा आस्थापना सूचीवर क्रिएट करण्याबाबत निर्देश दिले आहेत. आस्थापना विभागाने आस्थापना सूचीवर जागा निर्माण करण्याचा हा रिपोर्ट आहे. कोणत्या शिक्षकाच्या जागा भरायच्या हे नंतर ठरविण्यांत येईल.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** परवा त्यांनी आंदोलन केले. प्राथमीक शिक्षकांचे ३-४ महिने झाले त्यांना पगार नाही. काल परवाच आयुक्तांना भेटण्यासाठी शिक्षक आले होते.

**मा.महापौर मॅडम :-** विषय क्रमांक ३२ ना-मंजूर करण्यांत येत आहे.

---*---

**ठराव :-**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदास मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव प्रशासनाने सविस्तर माहितीसह पुन्हा फेर सादर करण्यांत यावा. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.श्री.उमेश खंडेराव कवडे,

अनुमोदक - मा.श्री.दिलीप नानाभाऊ सातपुते,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ३३** **दिनांक : ३०/१२/२०१७.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती वर्षे २०१०-२०११ सुजल व निर्मळ अभियान अंतर्गत शहरातील सर्व पाणी ग्राहकांच्या नळांना मीटर बसविणेसाठी महानगरपालिकेकडुन तयार करणेत आलेला प्रकल्प अहवालास मा.शासनाकडुन मंजुरी मिळणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ : १) महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र.नापापु.२०८ प्र.क्र. १ पा . पु. २२ मंत्रालय, मुबई ४०० ०३२ दि. २२ ऑक्टो ०८

२) मा. महासभा प्रस्ताव क्र. ३४ दि. २१/०१/२०१० अन्वये पारीत ठराव

३) मनपाचे पत्र क्र. १४११, दि. ३१/१/२०१२.

४) पा.पुं.व स्वच्छता विभागाचे पत्र क्र. सुनिअ-२०१२/ प्र.क्र.२२४/पापु-२२,दि. ०३/०४/२०१२.

५) मा. अव्वर सचीव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय. मुंबई यांचे पत्र दि.१७ मे २०१४

६) मनपाचे पत्र क्र. ११४१, दि. ०८/०१/२०१५.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, सद्यस्थितीत अहमदनगर शहरातील नागरीकांना महानगरपालिकेमार्फत केला जाणारा पाणी पुरवठा हा ठोक स्वरूपात केला जात आहे. नागरीक/ नळ कनेक्शन धारकांना नळाच्या साईज नुसार पाणी बीले आकारली जातात. नागरीक त्यांचे कुटुंबातील संख्येनुसार / गरजेनुसार पाण्याचा वापर करतात. यात काही कुटुंबे कमी प्रमाणात तर काही कुटुंबे जास्त प्रमाणात पाणी वापर करतात. पाण्याचे मोजमाप होत नसल्याने असे घडते. यास्तव सर्व नळ कनेक्शन धारकांना मीटरने पाणी पुरवठा केल्यास योग्य ते मोजमाप होईल व महानगरपालिकेला दिलेल्या पाण्याच्या प्रमाणात उत्पन्न मिळेल व नागरीकांनाही वापरलेल्या पाण्याच्या प्रमाणातच मोबदला देता येईल.

महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे शासन निर्णय दि. २२ ऑक्टोबर २००८ अंतर्गत हे महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती वर्ष २०१०-२०११ सुजल व निर्मल अभियान मागणी आधारीत व सुधारणात्मक उपाययोजनांशी निगडीत नागरी पाणी पुरवठा व मलनिःस्सारण कार्यक्रमातील अनुदानाचा सुधारीत वित्तीय आकृतीबंध लागू करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहे. या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेकडून शहरातील सर्व नळ कनेक्शनला मीटर बसविणेसाठी तयार केलेला रक्कम रूपये ५४.४० कोटीचा सविस्तर मुळ प्रकल्प अहवालास मा.शासनास प्रशासकीय मंजूरी मिळणे साठी महानगरपालिकेचे पत्र क्र.पा.पु १४११, दि. ३१/०१/२०१२ अन्वये सादर करण्यांत आलेला होता.

या अनुषंगाने मा. शासनाकडून संदर्भीय पत्र क्र.४ इकडेस प्राप्त झाले असून सदर पत्रात पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे दि. २२ आक्टो.२००८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद नागरी संस्थांनी करावयाच्या उपाय योजनेचे संक्षिप्त विवेचन दिले आहे. त्यानुसार स्थानिक संस्था व खाजगी संस्थांचे सहभागातून किंवा पूर्ण खाजगी सहभागातून ग्राहक मीटर्स बसविण्याबाबत नमूद करण्यांत आले आहे. त्यामुळे महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियांनांतर्गत आपल्या महानगरपालिकेच्या घरगुती मीटर बसविणेसाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध करून देणे बाबतच्या प्रस्तावाबाबत विचार करणे शक्य नाही. असे कळविले आहे. अहमदनगर महानगरपालिकेने विषयांकीत प्रकल्प अहवालास मंजूरी मिळणे व निधी बाबत मा. शासनास सादर केलेला प्रस्ताव व त्या अनुषंगाने मा. शासनाचे नामंजूरी बाबतचे प्राप्त पत्र इत्यादीचे अवलोकनानुसार महानगरपालिकेची मागणी शासनाच्या विचाराधीन नाही.

परंतू विषयांकीत प्रकल्प राबविणे अहमदनगर महानगरपालिकेच्या भविष्यातील दृष्टीकोनातून अत्यंत गरजेचा आहे. मा.शासनाकडील चालू असलेल्या योजनांच्या सुधात्माक कामे अंतर्गत नळ धारकांना मीटरव्दारे होणे गरजेचे आहे.

करिता

१) अहमदनगर महानगरपालिका अतंर्गत सर्व नळ कनेक्शन धारकांना मीटरव्दारे पाणी पुरवठा करणे कामी

२) सर्व नळ कनेक्शन धारकांना मीटर महानगरपालिकामार्फत लावून मीटर लावणे पोटीचा खर्च नळ कनेक्शन धारकांच्या (ग्राहकांच्या) पाणी पट्टीचा बीलात लावून वसूल करणेकामी

३) नविन इलेक्ट्रानिक्र्स पध्दतीचे ( महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मान्यताप्राप्त ) मीटर्स अंदाजे नग ५०,००० ( पन्नास हजार ) खरेदी करणेकामी ई निविदा प्रसिध्द करणेकामी .

करीता विषयांकीत प्रस्ताव मा.महासभे समोर चर्चेसाठी ठेवून मा.महासभेच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणे संयुक्तीक राहील. ऑफीस रिपोर्ट सविनय सादर.

**चर्चा :-**

विषय क्रमांक ३३ चे वाचन

**मा.महापौर मॅडम :-** काकडे माहिती द्या.

**अभियंता श्री.काकडे :-** मीटर बसविणे यापूर्वी महासभेने मंजूरी दिली आहे. मीटरची पट्टी कशा पध्दतीने त्याचे धोरण ठरवण्यासाठी हा विषय आहे. मीटर नागरिकांनी बसवायचे का महानगरपालिकेने बसवायचे हे धोरण ठरवण्यासाठी हा विषय आहे.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** माझ्याकडे मीटरल्या किमती आहेत. अर्ध्या इंची मीटर ९६०/- रुपये पाउण इंची मीटर साठी १७००/- रुपये १ इंची मिटरसाठी २६००/-

५०,००० मीटरसाठी साधारण १३ कोट लागतील. नागरिकांकडून वसुल करणार त्यामुळे यामध्ये कर दर मागवा महासभेसमोर त्याचा बाकीचा खर्च यासह आणा मग निर्णय काय करायचे ते ठरवू.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** जिथे २४ तास पाणी उपलब्ध होईल तिथे मीटर बसविणे योग्य.

**अभियंता श्री.काकडे :-** योजना मंजूर झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येणार आहे.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** फेज-१ केडगांवची स्कीम अजून पूर्ण नाही मटेरियल लागले तर आम्ही इंजिनियर यांना फोन लावतो आज पण केडगावला ४ थ्या दिवशी पाणी देतो. आधी योजनेचे काम पूर्ण करा.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** आम्हाला ही योजना लागू करायची नाही.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** केडगांवची योजना निविदेनुसार पूर्ण झाली आहे. शास्त्रीनगर टाकीचा १ गॅप पूर्ण राहीला आहे. केडगाव योजनेत एक ठिकाणी जागेचा वाद आहे. त्यामुळे गॅप पूर्ण करता येत नाही. हे काम ठेकेदाराचे आहे. एक ठिकाणी ११० मीटरचा एक गॅप राहीला आहे. आपणासमक्ष पाहणी केली आहे. मागच्या आठवडयात ठेकेदार येवून गेला. निविदेमध्ये जेवढी लाईन आहे तेवढी टाकुन झालेली आहे.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** किती दिवसाला पाणी केडगांवला देतो. माझा या योजनेला स्पष्ट विरोध आहे.

**मा.सौ.उषा ठाणगे :-** ३१ डिसेंबरला पाणी सोडू असा शब्द दिला होता शिवाजीनगर येथील टाकीत पाणी केंव्हा सोडणार.

**अभियंता श्री.काकडे :-** कल्याण रोडचे टाकीचे काम पेंडींग आहे. वसंत टेकडीचा जो लोड वाढवायचा आहे. सर्व कामाला तीन महिने तरी लागतील.

**मा.महापौर मॅडम :-** टाकी पूर्ण करण्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करा.

**उपमहापौर श्री.छिंदम :-** मीटर बसविण्याने नागरिकांचा कसा फायदा होणार ते सांगा.

**अभियंता श्री.काकडे :-** सध्याचा पाणी पुरवठा कमी असून सध्याच्या सिस्टीममध्ये मीटर बसविले जाणार नाही. या ठिकाणी पाणी वाढेल त्याच ठिकाणी सुरुवातीला मीटर बसविण्यांत येणार आहेत. व टप्प्याटप्याने सर्व शहरात मीटर बसविण्यांत येणार आहेत.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** २४ तास पाणी देणार असतील तर मीटर बसवा.

**उपमहापौर श्री.छिंदम :-** प्रत्येक मीटरला कॉक येईल त्याला जेवढे वापरायचे तेवढेच वापरतील स्टॉक पाणी करुन ठेवतात दुस-या दिवशी जर पाणी सुटले तर ते पाणी फेकुन देतात. प्रेशरमेंटन होणार आहे. मुळाडॅम मधुन पाणी कमी उचलावे लागेल.

**अभियंता श्री.काकडे :-** जेवढे पाणी वापरतील तेवढेच बील येईल. निविदा प्रक्रीया पूर्ण नाही. वॉर्डामध्ये नविन स्कीममध्ये मीटर बसविणे बंधनकारक आहे. पाण्यात वाढ झाल्यानंतर मीटर बसवावे लागेल. सध्या वापर पध्दतीत मीटर बसवत नाही.

**मा.महापौर मॅडम :-** हा विषय ३ टाक्यापूर्ण झाल्यानंतरचा आहे. पाणी योग्य प्रमाणात मीटर बसविल्यानंतर नागरीक वापरतील.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** आमचा या योजनेस विरोध आहे.

**मा.सौ.उषा ठाणगे :-** शिवाजीनगर पाण्याच्या टाकीत पाणी केंव्हा सोडणार ३-३ महिन्याची मुदत आम्हाला मान्य नाही.

**अभियंता श्री.काकडे :-** पीएमसी चे अहवाला प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे लवकरात लवकर काम पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

**मा.महापौर मॅडम :-** किती दिवसात काम पूर्ण करणार ते सांगा

**अभियंता श्री.काकडे :-** ३ महिने लागतील त्याच्या आत काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करु.

**मा.महापौर मॅडम :-** आपण स्वतः त्याचा पाठपुरावा करु.

**मा.सौ.मनिषा बारस्कर :-** डौले हॉस्पीटल समोरील पाण्याचे लिकेज बाबत कार्यवाही करा

**अभियंता श्री.काकडे :-** दोन दिवसात करु.

**मा.श्री.गणेश भोसले :-** दिनांक १६/०८/२०१७ ला एक पत्र दिले फेज -२ वर चर्चा करणे बाबत महासभेत विषय घ्या.

**मा.महापौर मॅडम :-** जेंव्हा मिटींग असेल त्यावेळी आपण उपस्थित रहा. आता माहिती घ्यायची असेल तर घ्या नाहीतर पुढच्या सभेत विषय घेवू.

**मा.श्री.गणेश भोसले :-** इम्पीरियल चौक ते चाणक्य चौक या रस्त्यावर पॅचिंग होत नाही. आम्ही कर भरत नाही का. देसरडा नावाच्या गृहस्थाच्या घरात कुत्रे घुसले लोक पाठवणे बाबत आरोग्य अधिकारी यांना फोन केला पण कुणी आले नाही. काल परवा पेशंट संदर्भात डॉक्टरांना फोन केला. कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाण्याची वाईट अवस्था आहे. काही दिवसात तो दवाखाना बंद पडणार आहे. असे स्टेटमेंट पेपरात आले आहे. अतिशय गंभीर विषय आहे. रिलायन्स कंपनी तर्फे खोदाईचे कामापोटी ४० ते ५० लाख भरुन घेतले माझ्या प्रभागातील रोड खोदणार या ठिकाणी रोड फुटले बी.एम.पॅचींग इतरत्र करु नये, नाहीतर मी तुमच्या दालना समोर उपोषणाला बसणार. दुसरीकडे वापरण्याचा अधिकार नाही. किती दिवस झाले कोंडवाडा होत नाही.

**मा.श्री.अभय आगरकर :-** नगरसेवकांचे प्रश्न प्रश्नोत्तराचे तासात घ्या एक तास यासाठी राखीव ठेवता येतो.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** पुढच्या महासभेत एक तास प्रश्नोत्तराचा तास घ्यावा. प्रशासनाकडून जर नगरसेवकांचे प्रश्नाला उत्तर मिळाले नाही तर आम्ही प्रश्नोत्तराचे तासात उत्तर मागू.

**अभियंता श्री.निंबाळकर :-** राजेंद्र जाधव यांना काम देण्यात आले आहे. त्यांना प्रामुख्याने सावेडी भाग घेण्यात आला. २-३ दिवसात काम चालू करण्यात येईल.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** कुष्ठधाम वैदुवाडी रस्ता पॅचींग केलेले नाही.

**मा.श्री.दत्ता कावरे :-** कलेक्टर ऑफिस शेजारील पुरवठा कार्यालय ते नगरकॉलेज पर्यंत रस्ता अत्यंत खराब झालेला आहे. पॅचींग करावी.

**अभियंता श्री.काकडे :-** खोदाई करीता लागणा-या रक्कमेची निविदा काढली जाते.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** स्थायी समितीचा ठराव आहे. दिशाभूल करु नका दोन वेशीचे आतमध्ये रस्ते पॅचींग केले का. रुपये ५६ लाख आहे आहेत पहिले ५० लाख असे एकुण ९४ लाख शिल्लक आहेत.

**अभियंता श्री.निंबाळकर :-** तो ठराव वेगळा आहे. त्याची निविदा प्रक्रीया चालू आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** चुकीचा पायंडा पाडू नका वेळ आल्यास मी कोर्टात जाईल.

**मा.महापौर मॅडम :-** सन्माननीय सदस्यांनी जे सुचवले त्यानुसार रिलायन्स निधीतुन पॅचींग कामे करण्यात यावे.

**डॉ.श्री.राजुरकर :-** भोसले यांनी जी माहिती दिली कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याची सेवा बंद पडणार. काम निश्चीत कमी झाले.आर.एम.ओ., स्टाफ नर्सची पुर्तता करणेसाठी प्रयत्न चालू आहेत. भुलतज्ञ उपलब्ध होत नसल्याने मध्यंतरी काम थांबले होते. त्यांचे मानधन न दिल्याने त्यांनी काम करण्यास नकार दिला होता. परंतु चर्चा करुन काही मानधन पालिकेने आता पॅनलवर १० जण उपलब्ध झाले आहेत. ब-यापैकी अडचणी सोडविल्या. डॉ.पाठक व डॉ.गुंजाळ हे स्त्रीरोग तज्ञ होते त्यापैकी डॉ.गुंजाळ यांनी राजीनामा दिला. आत्तासध्या जो पहिला मजला आहे तेथे ३० बेडची व्यवस्था चालू ठेवली आहे. खालच्या ५० बेडची सर्व्हीस बंद ठेवली आहे. डॉक्टर, नर्स अभावी सेवा बंद पडू नये म्हणुन आउटसोर्सीग स्टाफ मागणेची पुर्तता चालू आहे. एन.यु.एच.एम. अंतर्गत डॉक्टर उपलब्ध झाल्यानंतर सुविधा व्यवस्थीत सुरु राहील. इमारतीच्या अडचणी मनुष्यबळाच्या अडचणी आहेत. डॉ.पाटील एक वर्षापासुन गैरहजर आहेत.

**विरोधी पक्ष नेता श्री.बाळासाहेब बोराटे :-** आपण त्यांना विचारणा करणार की नाही.

**डॉ.श्री.राजुरकर :-** स्त्री रोग तज्ञांचे पॅनल नेमण्यासाठी स्थायी समितीपुढे प्रस्ताव ठेवतो आहे.

**मा.महापौर मॅडम :-** आयुक्तांनी वेळोवेळी सांगीतले आहे. डॉक्टरांशी चर्चा करुन निर्णय घेणे बाबत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** २५ लाखाचा कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासाठी निधी आला तो मानधनासाठी का वापरला नाही.

**मा.श्री.गणेश भोसले :-** किती डिलीव्हरी रोज होतात. पुर्वी किती डिलीव्हरी व्हायच्या.

**डॉ.श्री.राजुरकर :-** आता तीन होतात. पुर्वी १५ डिलेव्हरी होत होत्या.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** मध्यंतरी कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे घटना घडली त्यावेळी तेथील डॉक्टरांनी माहिती दिली भुलतज्ञ उपस्थीत नव्हते अशी माहिती दिली. त्यांचा ५ महिन्याचा पगार दिला गेला नाही. सेन्सेटीव्ह पध्दतीने पाहिले पाहिजे आयुक्त साहेब आपल्या किती व्हीजीट तेथे दिल्या. एका कर्मचा-याने त्या ठिकाणी लघवी केली हे प्रकरण दाबले गेले. इतर विभागात मानधनावर कर्मचारी आस्थापना विभागामार्फत घेतले जातात.

प्रशासनाकडून समाधानकारक उत्तर दिले जात नाही. नवीन वर्षात एक शपथ घ्यावी. कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याची परिस्थिती सुधारावयाची आहे. मा.महापौरांनी यामध्ये पुढाकार घ्यावा. प्रशासनास आपण कडक शब्दात सुचना द्या. एक काम मार्गी लागत नाही. खालचे कर्मचारी त्यांचे वरिष्ठांचे ऐकत नाही अशी माझी माहिती आहे.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याच्या सद्यस्थीती बाबत भुलतज्ञा बाबत थकीत पेमेंट बाकी होते. जवळपास ५-६ भुलतज्ञ कॉल बेसीसवर उपलब्ध झाले आहेत. रिक्त पदांच्या बाबतीत खरोखर आवश्यकता आहे. शासनाकडे आस्थापना खर्चाची जी अट आहे. ३५% त्यापेक्षा आपला खर्च जास्त आहे. त्याचे शिथीलीकरण करण्यासाठी आपण शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. एन.यु.एन.एम. अंतर्गत काही पदांची भरती आपण करत आहोत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** नगर शहराला आपण काय देतो. पुढच्या वर्षात आपण कामाची अपेक्षा करतो.

**मा.महापौर मॅडम :-** १५ मिनीटांसाठी सभा तहकुब, उपमहापौर बसतील.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** आपणांकडून रुलिंग देता येणार नाही. सुलज निर्मल योजना अंतर्गत पाणी मीटर बसवणार का ? शासनाचे दिनांक २२/०१/२००९, ०३/०४/२०१२, १७ मे २०१४, ८ मे २०१५ हे पत्र कुठे आहेत. पत्राचे संदर्भ दिले आहेत. शासनाने काय-काय रेफरन्स दिले. पत्र वाचा. दिनांक २२ ऑक्टोंबर २००८ मा.शासनाने काय कळविले.

**अभियंता श्री.काकडे :-** दिनांक २२ ऑक्टोंबर २००८ चे पत्र वाचन करण्यांत आले. जी.आर. महाराष्ट्र शासन पत्र व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक नापापु.२०८५३/पा.पु.२२ मंत्रालय मुंबई.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** वॉटर ऑडीट व एनर्जी ऑडीट महानगरपालिकेने केलेले नाही. वॉटर ऑडीट मध्ये जी वितरण व्यवस्था आहे. त्यामधील डॅमेज दुरुस्ती करणे हा उद्देश आहे. पुढच्या वर्षी एनर्जी ऑडीट केले जाईल.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** आता जे पंप बसविले ते दोन वर्षापुर्वी खरेदी केले आहे. फेज-२ चे काम दिनांक २१/०६/२०१० रोजी सुरु झाले त्याची मुदत ३ वर्षे होती त्यास वेळोवेळी मुदतवाढ दिली. आतापर्यंत साधारणतः ११ वर्षे झाली शासनाचे जी.आर. प्रमाणे भुयारी गटार योजना प्रोजेक्ट बंद आहे. त्याची दखल २००८ पासुन कोणी घेतली नाही. मग याला दिनांक २१/१०/२०१० च्या ठरावानुसार पाणी पुरवठा कामे का पूर्ण झाली नाही. त्याचे ऑडीट झाले नाही. अनेक महासभेत हा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्याची मान्यता आमच्याकडे नाही. दि.२१/११/२०१० चा ठराव महासभेचा काय आहे.

**अभियंता श्री.काकडे :-** ठराव वाचन केले.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** सन २०१० ला करार करण्यासाठी मान्यता दिली. करार झाला का.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** करार झाला डी.पी.आर. बनवला शासनाने तो नामंजूर केला.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** डी.पी.आर.तयार झाला २०१७ आले. डी.पी.आर.शासनाने नामंजूर केला. हा कोणाच्या अधिकारात ५४ कोटींचा विषय झाला.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** अमृत योजनेत मीटर बसविण्यासाठी बंधनकारक करण्यात आले. प्रस्ताव क्रमांक २४ दिनांक ०९/११/२०१५ .

**मा.श्री.दिप चव्हाण :-** दिनांक ०८/०१/२०१५ चा काय ठराव आहे. अमृतच्या विषया संदर्भात एक ओळ यात आली नाही.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** दिनांक ०८/०१/२०१५ चे पत्र आहे. महानगरपालिकेने अवर सचिव यांना पाठविलेले पत्र वाचुन दाखविण्यांत आले. दिनांक ०२/११/२०१५ ला आपण मंजूरी घेतली. नाकारल्यानंतर मिनवाईन अमृत योजना मध्ये त्यात मीटर बसविणे बंधनकारक करण्यांत आले. मीटरमध्ये प्रकार असतात. नागरिकांना कोणी इलेक्ट्रीक मीटर बसवेल. कोणी मीटर बसवितांना नागरिकांनी खरेदी न करता महानगरपालिकेने एक टाईपचे खरेदी करायचे. नागरिकांकडून तो खर्च वसूल करायचा.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** महाराष्ट्र सुवर्ण जयंती योजना बंद झाली आहे. अजेंडा तुम्ही काही करताल अमृतचा प्रस्ताव कुठेच उल्लेख नाही. पाण्याचे ऑडीट २००८ पासुन आत्तापर्यंत झाले नाही. धोरण ठरवायची कच्ची प्रस्तावना नाही. ५० हजार खरेदी करणेकाम प्रस्तावित करणेंत यावेत. ५३ कोटी केडगांवचा प्रस्ताव आहे. २००८ ची पुर्तता नाही. मलनिस्सारण बंद झालेले आहे. अमृतचा विषय या प्रस्तावात एक ओळ नाही. शासनाने डी.पी.आर.हा नामंजूर केला आहे. शासनाचे बंधन नाही. तुम्ही दिलेल्या ऑफिस रिपोर्ट मध्ये आहे. अमृतमध्ये ठराव झाला तर आजची मंजूरी कशाला घेता.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** १.२.३ ला मंजूरी मागतो. दिनांक ०९/११/२०१५ चा ठराव वाचून दाखविला.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** एखादे धोरण ठरविले नाही. व ई निविदा पर्यंत यायचे हे कोणत्या धोरणात आहे. खर्चाचे एस्टीमेट कुठे आहे. कशाचे आधारे खर्च काढला. किती खर्चाला मंजूरी घेता.

पहिले ऑडीट करणे हे गरजेचे आहे. अमृतचा समावेश करुन मग विषय घेणे. शासनाची योजना बंद झालेली असतांना या विषयात समावेश करावा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** सभागृहाचा कल पाहता. मीटरव्दारे नळ कनेक्शनचा प्रस्ताव प्रशासनाने चुकीच्या पध्दतीने आणला आहे. फेज-२ योजना अद्याप पूर्ण नाही. मग एवढी घाई कशाला. ३१० ते ४७० कि.मी. नगर शहरामध्ये वितरण व्यवस्थेचे काम बाकी आहे. ते केंव्हा पूर्ण होईल वितरण व्यवस्था ही किती की.मी.टाकणे बाकी आहे.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** अहमदनगर शहरापुरत पाणी पुरवठा योजना फेज-२ वितरण व्यवस्था ५६५ कि.मी. जवळ जवळ २६१ कि.मी. काम झाले आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** ३०० कि.मी. योजना बाकी आहे. २०० कि.मी. ७ वर्ष लागले किती दिवसात काम पुर्ण करणार.

**मा.आयुक्त श्री.मगळे साहेब :-** साधारणत: १०-१२ महिने लागतील.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** योजना जर १० वर्षात पुर्ण झाली नाहीतर तुमच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करु का

**सभागृहनेता श्री.गणेश कवडे :-** उपनगरात अडचण नाही. तरी ७ वर्षे लागले. शहरात भरपुर अडथळे आहेत.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** वर्षभराचा कालावधी लागेल. निर्मलनगर, भिस्तबाग, नागापूर, टाक्यांचे काम ९० ते ९५ टक्के झाले आहे. नागापूर पहिल्या टप्प्यात या ३ टाक्या पूर्ण होवू शकतील कारण या टाक्यांची लाईन सेपरेट आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** समर्थनगरची टाकी केंव्हा चालू होईल.

**मा.श्रीमती.नसीम शेख :-** मुकुंदनगर पाण्याची टाकी केव्हा सुरु होईल.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** पाण्याच्या टाकीचे काम पूर्ण वितरण व्यवस्था ९५ टक्के पंप हाउसला सप्लाय साठी जो वाढीव लोड लागतो एमएसईबी कडे ३४ लाख रुपये भरले त्याचे काम अपूण एमएसईबीचे काम झाले की पाणी देता येईल.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** एक वर्षात काम पूर्ण झाले नाही तर जबाबदारी कोणाची.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ७ वर्षापासुन काम चालू. ३ वर्षात काम चालू करणे बंधनकारक असतांना त्याने केले नाही.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** जवळ जवळ १४ लाख दंड वसुल केला.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** या योजनेला ३ वर्ष लागत होते. निम्मे अजून बाकी, महापौर यांनी तुमचे आदेश प्रशासनाला द्यावेत. पुढच्या महासभेपर्यंत ४०० कि.मी.चे काम करणे बाबत आदेश द्यावेत. काय आढावा बैठक घ्यायची ती त्यापुढचे टार्गेट १००, २०० चे आहे ते दिवाळीपुर्वी घ्या.

**मा.महापौर मॅडम :-** निकम सो सांगीतले, तीन टाक्यांसाठी मीटर बसविणे गरजेचे आहे त्याकरीता मीटर बसविणे गरजेचे आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** रुलिंग द्या.

**मा.श्री.सागर बोरुडे :-** नागापूर, बोल्हेगांव येथील नागरीक मीटर बसवू देणार नाहीत.

**मा.श्री.सचिन जाधव :-** हा जो प्रस्ताव चुकीच्या पध्दतीने आणला संपूर्ण शहरात सुरळीत पाणीपुरवठा सुरु होईल त्यावेळेस विषय घ्या.

**मा.महापौर मॅडम :-** विषय क्रमांक ३३ सभागृहात झालेल्या चर्चेनुसार हा विषय रद्द करण्यात यावा. फेरसादर करतांना परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** पाण्याचे ऑडीट झाल्याशिवाय फेरसादर करता येणार नाही.

**विरोधी पक्ष नेता मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** घसारा निधीतुन ज्या हायड्रोलिक सिस्टीमचे वाहने इले.विभागासाठी घेतल्या त्या कुठे आहेत.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** २ गाडया घेण्याबाबत मंजुरी मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता.मा.स्थायी समितीने सदर प्रस्ताव फेटाळला.नव्याने टेंडर प्रसिध्द करण्यात आले असुन दि६-१-१८ रोजी टेंडर दाखल करण्याची अंतिम तारिख आहे.चेसीवर बॉडी बांधण्यासाठी टेंडर काढले.एक्साईज डयुटी आपल्याला माफ होणार आहे.शुभयान मोटर्स कडे गाडया आहेत.गाडया खरेदी करुन ३-४ महिने झाले आहेत.शासनाचे परिपत्रकानुसार नवीन टेंडर काढले आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** सन २०१७-२०१८ च्या अंदाज पत्रकाच्या प्रति १५ दिवसापुर्वी मिळाल्या.या प्रतीवर मा.बाळासाहेब ठाकरे,छत्रपती शिवाजी महाराज, मा.मुख्यमंत्री, मा.पंतप्रधान, मा.शरदचंद्रजी पवार साहेब, मा.पालकमंत्रीसाहेब,मा.आमदार,मा.खासदार यांचे फोटो नाही .अत्यंत दुर्दवी बाब आहे.यापुढे येणा-या अंदाजपत्रातील छपाई पुर्वी आपण एकदा नजरेखालुन घाला.सर्वाचे फोटो येतील याची काळजी घ्या.

**मा.महापौर मॅडम :-** यापुढे सर्वांचे फोटो टाकण्यात यावेत. कॅफोंना आदेश देण्यात येत आहे. पुढील विषय घ्या.

---*---

**ठराव :-** ऑफीस रिपोर्ट व सभागृहात झालेली चर्चेचा कल पाहता महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती वर्षे २०१०-२०११ सुजल व निर्मळ अभियान अंतर्गत शहरातील सर्व पाणी ग्राहकांच्या नळांना मीटर बसविणेची कार्यवाही शहर पाणी पुरवठा फेज-२ योजनेचे काम पूर्ण झाले नंतर करण्यांत यावी. ग्राहकांच्या नळांना मीटर बसविणे

बाबतचे धोरण ठरविणे करीता परिपुर्ण प्रस्ताव नव्याने फेरसादर करण्यांत यावा. यास ही सभा मान्यता देत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

तसेच गटनेते मा.श्री.संजय शेंडगे, यांनी दिलेल्या पत्रानुसार मा.शासनाच्या नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) किंवा इतर कोणत्याही योजने अंतर्गत सन २०१८-२०१९ साठी प्राप्त होणा-या निधीतुन सोबत जोडलेल्या यादीतील ३१ कामे प्राधान्याने घेण्यांस ही सभा मान्यता देत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सूचक - मा.श्री.गणेश खंडेराव कवडे,

अनुमोदक - मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ३४** **दिनांक : ३०/१२/२०१७.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१८-२०१९ विहित नमुन्यात प्रारुप आराखडा सादर करणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- जिल्हा प्रशासन अधिकारी जिल्हाधिकारी कार्या. अ.नगर (नगरपालिका शाखा) क्र.नपा, कार्या-६अ/३०२३ /२०१७ दिनांक २९/०९/२०१७.

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये विनंतीपुर्वक सादर करण्यात येते की, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१८-२०१९ चा प्रारुप आराखडा तयार करण्यासाठी महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग यांचेकडील सुचनेच्या अनुषंगाने नीधी मागणी प्रस्ताव / प्रारुप आराखडा विहित नमुन्यात प्रपत्रामध्ये तयार करुन हमीपत्रासह जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेकरीता सादर करणे बाबत कळविलेले आहे.

अग्निशमन विभागाकरीता प्रारुप वार्षिक योजना २०१८-२०१९ च्या प्रस्तावित नियतव्ययाच्या गोषवा-यामध्ये सर्वसाधारण योजना मध्ये अहमदनगर महानगरपालिकेस अंदाजित उपलब्ध होणारे अनुदान रक्कम रुपये १०,००,०००/- (दहा लक्ष फक्त) इतके असुन सन २०१८-२०१९ करीता प्रस्तावित कामाकरीता खर्च करण्यात येणार असुन सदर अहवाल खालील प्रमाणे

| **अ.नं.** | **मनपाचे नाव** | **उपलब्ध होणारे अनुदान** | **सन २०१८-२०१९ करीता प्रस्तावित असणारी कामे** | **कामाची किंमत** | **यापैकी भांडवली खर्च** |
|---|---|---|---|---|---|
| १ | अहमदनगर महानगरपालिका | १०,००,०००/- | १. श्वसन उपकरण खरेदी ३ नग | १ नग अंदाजे १,००,०००/- प्रमाणे | ३ लक्ष |
| | | | २. फायर सुट - १० नग | १ नग अंदाजे ५००००/- प्रमाणे | ५ लक्ष |
| | | | ३. श्वसन उपकरण कॉम्प्रेसर | १ नग अंदाजे २,००,०००/- | २ लक्ष |

सबब सदर मागणीचा प्रस्ताव मा.जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेकरीत पाठवावयाचे झाल्यास मा.सर्वसाधारण सीची मंजुरी असणे उचीत राहील. तथापि सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे घेणेस व प्रस्तावास मान्यता मिहालेनंतर मा. जिल्हा नियोजन समितीपुढे सादर करणेस मान्यतेस्तव तथा पुढील निर्णयास्तव सविनय सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक श्री.खरात यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ प्रमाणे कार्यवाहीस हरकत नाही. मागील नस्ती सह प्रस्ताव फेरसादर करणे.

यावर मुख्यअग्निशामक अधिकारी यांचा फेरसादर रिपोर्ट की, यापूर्वी सन २०१२-२०१३ मध्ये महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत जिल्हा नियोजन समिती अंतर्गत रु.३०.१६ लक्ष निधी प्राप्त झालेला असुन त्याची पूर्ण संचिका माहितीस्तव सविनय सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक श्री.खरात यांचा अभिप्राय की, विभागाने ब प्रमाणे खुलाशा नुसार अ प्रमाणे कार्यवाहीस हरकत नाही.

यावर उपायुक्त श्री.चव्हाण यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, उपरोक्त अहवालामधील अ व ब प्रमाणे मान्यतेस्तव मा.महासभेकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :-**

**मा.श्री.गणेश भोसले :-** फायरमन आहेत का महानगरपालिकेकडे.

**मा.श्री.सचिन जाधव :-** एखादी मोठी दुर्घटना घडली तर प्रशासन जबाबदार राहील. प्रशासनाने त्वरीत भरती करावी.

**अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :-** शहर व सावेडी कडे २९ कर्मचारी आहेत. ८ ड्रायव्हर, ८ जण राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राकडून प्रशिक्षण घेतलेले आहे. उर्वरीत उद्यान व बांधकाम विभागाकडील कर्मचारी आहेत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** किती दिवसाचे ट्रेनिंग घेतले आहे.

**अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :-** ३ महिन्याचे ट्रेनिंग घेतले. ८ कर्मचारी पुरेसे आहेत का किती गाडया पाहिजे किती कर्मचारी पाहिजे ते सांगा.

**अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :-** एका गाडीवर किमान १८ कर्मचारी असणे आवश्यकआहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** सावेडी भागात एका अपार्टमेंट मध्ये आग लागली मी मिसाळ यांना फोन केला या कारवाईचे वेळी जे पाईप आणले ठिकठिकाणी फुटलेले होते.आम्ही बादल्याने पाणी मारले.

**अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :-** कर्मचारी-यांची चुकी होती कचराडेपोवरील पाईप ते घटनास्थळी घेवुन गेले

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** याबाबत तुम्ही संबधीतावर काय ॲक्शन घेतली.

**अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :-** संबधीत कर्मचारी यांना मी समज दिली.

**मा.श्री.सचिन जाधव :-** तुम्ही लोक भरणार आहात की नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** कर्मचारी भरतीसाठी तुम्हाला काही भिती आहे का,आमच्या कडे नागपुर फायर ट्रेनिंग कोर्स पुर्ण केलेले उमेदवार उपलब्ध आहेत.वारंवार मी आपणाशी याबाबत संपर्क साधला. पुढील बजेट मिटींगच्या अगोदर जर कर्मचारी भरती केली नाही तर आम्ही मिसाळ यानां बसु देणार नाही.

**मा.श्री.सचिन जाधव :-** हा एकदम अति तातडीचा विषय आहे.

**मा.श्री.अभय आगरकर :-** नगररचनामार्फत किती मजल्याला बांधकाम परवानगी दिली जाते. १० व्या मजल्यावर पोहोचण्यासाठी साधन सुविधा आपल्याकडे नाही.ना हरकत दाखला आपण देतो. ही एक तफावत आहे. आस्थापना खर्च कशा पध्दतीने कमी करता येईल. इले. पा.पु.सर्व डिपार्टमेंटचे ऑडीट केले तर लक्षात

येईल लाखो रुपयांचा खर्च करुन तुम्ही काय मिळवले.सोशल ऑडीट सर्व विभागाचे व्हायला पाहिजे.उत्पन्नाचे साधने वाढविणे हि महत्वाची बाब आहे.

**मा.उपमहापौर श्री.छिंदम :-** बिल्डींगला आपण बांधकाम परवानगी देताना आपण अग्नीशमन कर घेतो ते कोणत्या खात्यावर जमा करतो.

**अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :-** महानगरपालिका फंडात जमा करतो.कायदयात तशी तरतुद आहे.

**मा.उपमहापौर श्री.छिंदम :-** ते खाते वेगळे करा.व ही रक्कम अग्नीशमन दल सक्षम करण्यासाठी वापरा

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** घसारा निधी रु. ५० लाख पडुन आहे

**अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :-** अग्नीशमन विभागाला १२ ते १५ लाख उत्पन्न मिळते.अग्नीशमन विभागाचा आकृतीबंध नुकताच मंजुर झालेला आहे.

**मा.श्री.सचिन जाधव :-**किती नवीन लोक भरायचे ते भरा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** एमआयडीसी,देवळाली प्रवरा नगरपालिका यांच्या गाडया मागवतो त्यांना किती रकक्म दिली जाते.

**अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :-** त्यांचे मंजुर दरानुसार बील दिले जाते.आपणही आपली गाडी हदद्ीबाहे गेली तर त्यांचेकडुन रक्कम वसुल करतो.

**मा.श्री.अभय आगरकर :-** आपल्याकडे फोम टेंडर आहे का

**अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :-** ३ फोम टेंडर आहे,१ वॉटर टेंडर आहे

**मा.श्री.अभय आगरकर :-** ते सुस्थीतीत आहे का

**अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :-**फायरमनची डिमांड आम्ही केली आहे. आउटसोर्सींग मार्फत भरती करावी असे आदेश दिले आहेत.२वेळा जाहीरात दिली परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही.

**मा.श्री.सचिन जाधव :-**मानधनावर नेमणुकीसाठी अर्ज मागवुन मुलाखती घेवुन लवकर प्रोसेस करा.

**मा.श्री.गणेश भोसले :-**आउटसोर्सींग मार्फत भरती केल्यास ठेकेदार त्याची रक्कम कापुन घेतो

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** मानधनावर कर्मचारी घेता येतील.रिक्त पदांचा आढावा घेवुन पुढच्या काही दिवसात मानधनावर कर्मचारी घेता येतील.

**मा.श्री.सचिन जाधव :-** आकृतीबंधात पदे मंजुर आहेत.

**आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :-** बिंदुनामावली वर्ग ३ व वर्ग ४ ची प्रलंबीत आहे. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयामुळे काम थांबले आहे. या पदासाठी सेवाप्रवेश नियमात शैक्षणीक पात्रता काय असावी याचा उल्लेख नाही. नगरविकास विभागाने राज्य अग्नीशमन सल्लागार यांना पत्र दिले आहे परंतु अदयाप त्यांचे उत्तर अदयाप आलेले नाही यावर मार्ग काढण्यात येत आहे.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** राज्य अग्नीशमन केंद्राकडुन पात्रतेबाबत माहिती मागविता येईल जाहीरात काढुन मानधनावर पदे भरता येतील का ते पाहु मानधनावर पद भरतीबाबत तातडीने कार्यवाही करण्यात येईल .अग्नीशमन करापोटी जमा होणारी रक्कम स्वतंत अकौंट उघडुन त्यात जमा करण्यात येईल.

**मा.श्री.सचिन जाधव :-** विषय मंजुर करा. महाराष्ट्र शासनाचा अग्नीशमन सब ऑफीसर कोर्स केलेले, हेवी वाहन चालविण्याचा परवाना असलेले व ३ वर्षाचा कामाचा अनुभव असलेले स्थानिक प्रशिक्षीत व प्रगत मुलांची मानधनावर नियुक्ती करावी. १ सब ऑफीसर व ५ फायरमन पद भरती तातडीने करा.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** राज्य अग्नीशमन केंद्र यांचेकडुन शैक्षणीक पात्रतेबाबत मागणी केली आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** तुमच्याकडे कार्यरत कर्मचा-यापैकी बिगारी किती.

**अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :-** सर्वच बिगारी आहेत.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** एवढे मोठे दुर्लक्ष एखादी घटना घडली तर याची जबाबदारी कोणावर निश्चीत करणार मुंबई सारखे शॉर्टसर्किटची घटना घडली तर जबाबदारी कोणावर निश्चीत करणार त्या पदावर पदोन्नती का देत नाही.कर्मचा-याना नवीन पद भरण्यासाठी आस्थापना खर्चाची मर्यादा आहे.६-२-१६ पासुन आकृतीबंधानुसार मंजुरी मिळाली त्यानुसार प्रमोशन का देत नाही.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** दोन्हा गोष्टी साठी शैक्षणीक अर्हता त्यांनी लावलेली आहे

**मा.श्री.दिप चव्हाण :-** इतर कर्मचा-यांना पदोन्नती का देत नाही.प्रमोशन घेतलेल्या पदावर त्या कर्मचा-यांना बसवत का नाही.विशेष लोकांना पदोन्नती दिली. ६-२-१६ पासुन आकृतीबंध मंजुर झालेला आहे.निवडसमितीच्या बैठका नियमीत होत नाही .अधिकारी गैरहजर राहतात.
१२-२४ वर्ष पुर्ण झालेल्या कर्मचा-याना कालबध्द पदोन्नती दिली जात नाही.प्रमोशन दया,नवीन पद भरती करता येणार नाही .आहे त्या कर्मचा-यांना पदोन्नती दया.सोनटक्के ना कोणते पद दिले आहे.

**आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :-** वर्ग-२ चा उपअभियंत्याचे वेतन दिले जाते.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** पदोन्नतीसाठी बिंदुनामावलीची अडचण नाही.

**आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :-** आकृतीबंधात अट टाकली आहे.बिंदु नामावली मंजुरी बंधनकारक आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** नाशिक विभागीय आयुक्ब्त कार्यालयास शासनाने काही लेखी दिले का? ज्या पदावर पदोन्नती घेतली त्या पदावर ते काम ते कर्मचारी करीत नाही .

**मा.महापौर मॅडम :-** ऑफिस रिपोर्ट मंजूर. अग्निशमन विभागाकरीता ऑफिसर व फायरमन पदे तातडीने भरण्याबाबत कार्यवाही करावी.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१८-२०१९ विहित नमुन्यात प्रारुप आराखडा सादर करणे बाबतचे प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे.

अग्निशमन विभाग सक्षम होण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा अग्नीशमन सब ऑफीसर कोर्स केलेले कामाचा अनुभव असलेले स्थानिक प्रशिक्षीत व प्रगत मुलांची मानधनावर नियुक्ती करावी. त्यामध्ये १ सब ऑफीसर व ५ फायरमन पद भरती करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.श्री.बाळासाहेब मारुती बोराटे,

अनुमोदक - मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ३५** **दिनांक : ३०/१२/२०१७.**

---

प्रस्तावाचा विषय :- सारसनगर या भागाला **"क्रांतीज्योती सावित्रीआई फुलेनगर"** असे नामकरण करणे बाबत...

संदर्भ - मा.महापौर यांचेकडील नगरसेवकांचे दि.०३/०१/२०१७ रोजीची यादी व मा.महापौर कार्यालय जा.क्र.पी.ए.८५४ दि.०७/०२/२०१७ व १४४ दि.२५/०५/२०१७ चे पत्र.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ - मा.महापौर यांचेकडील नगरसेवकांचे दि.०३/०१/२०१७ रोजीची यादी व मा.महापौर कार्यालय जा.क्र.पी.ए.८५४ दि.०७/०२/२०१७ व १४४ दि.२५/०५/२०१७ चे पत्र.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, विषयांकित नाव देण्याचा प्रभाग हा क्र २६, २९ व ३० मधील काही भाग मिळुन तयार होतो त्यामुळे अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील जे प्रमुख उपनगरे आहे त्यातील सारसनगर हे एक उपनगर आहे. सदर उपनगरात विविध रस्ते आहेत त्यांना काही ठिकाणी अगोदर नामकरण केलेले आहे त्यामुळे उपरोक्त नाव कोणत्या ठिकाणापासुन ते कोणत्या ठिकाणापर्यंत तसेच कोण कोणते रस्ते व कोणता भाग यामध्ये समाविष्ट होतो याचा निश्चित बोध होत नाही.

संदर्भीय पत्राव्दारे सारसनगर या भागाला **"क्रांतीज्योती सावित्रीआई फुलेनगर"** असे नामकरण करणेबाबत मा.नगरसेवक यांनी मागणी केलेली आहे. सद्यस्थितीत सदर भागाला सारसनगर असे प्रचलीत नांव आहे.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास, चौकास, इमारसतीस भुखंडास अथवा सभागृहास नामकरण देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील महानगरपालिकेची आवश्यक व स्वेच्छाधिन कर्तव्ये मधील कलम ६३ (९) अन्वये "महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नांव देणे " अशी तरतुद आहे.

सारसनगर या भागाला क्रांतीज्योती सावित्रीआई फुलेनगर असे नामकरण करण्याचा अधिकार मा.महासभेस असल्याने प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करणेस रिपोर्ट सविनय सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, प्रस्तावित प्रकरणी आपले अभिप्रायाची आवश्यकता आहे. तरी आपला अभिप्राय इकडेस मिळावा हि विनंती.

यावर नगररचनाकार श्री.धोंगडे यांचा अभिप्राय की, प्रस्तुत प्रकरणा बाबत या विभागाने अभिप्राय मागणेचे प्रायोजन समजुन येत नाही. सबब मुंबई प्रा.मनपा अधि.१९४९ मधील तरतुदी काळजीपुर्वक तपासून पुढील कार्यवाही करणेत यावी.

यावर उपायुक्त श्री.चव्हाण यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर अतिरिक्त आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालानुसार मान्यतेस्तव मा.महासभेकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब यांचा अभिप्राय की, मुं.प्रा.म.अधिनियम कलम ६३(९) अन्वये कारवाई करण्यासाठी सदर बाब महासभेकडे सादर करावी.

---*---

**चर्चा :-**

**विरोधी पक्ष नेता मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** गॅझेट मध्ये सावित्रिआई फुले असे नाव आहे त्यामुळे प्रस्तावात आई या नावाचा उल्लेख करण्यात आला आहे.

**मा.श्री.सचिन जाधव :-** आज सावित्रीबाई फुलें यांची जयंती आहे प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**मा.श्री.सागर बोरुडे :-** या नावाला काहींचा विरोध अशी वृत्तपत्रात बातमी आली आहे.तुमच्यावर कोणाचा दबाव आला त्याचा खुलासा करा.

**मा.महापौर मॅडम :-** विषय क्र.३५ ऑफिस रिपोट मंजुर

**मा.श्री.कैलास गिरवले :-** ब-याच वेळा राष्ट्रपुरुषांची नावे आपण देतो.ज्या ज्या ठिकाणी मनपाच्या वतीने नावे देतो त्या ठिकाणी त्या नावाच्या कमानी बसवा.माळीवाडयात ढोरवस्ती रस्त्याला कपीलेश्वर नगर असे नाव देण्यात यावे.

**मा.श्री.सचिन जाधव :-** मंगलगेट चौकात संतकोंडयामामा मंदीर आहे त्या ठिकाणी त्वरीत नामफलक लावण्यात यावा.ठराव यापुर्वी झालेला आहे.बांधकाम विभागाला आदेश दया.

**मा.महापौर मॅडम :-**सचिन जाधव यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यानुसार पुर्तता करावी.

**प्र.नगरसचिव श्री.तडवी :-** आजची सभा ही तहकुब सभा असल्याने आयत्या वेळचे विषय या सभेत घेता येणार नाही.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** खर्चासह मंजुरी दया

**मा.महापौर मॅडम :-** नावाचा फलक आणि कमानीच्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

**प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** १५ दिवसात कोंडयामामा चौक नाम फलकाबाबत कार्यवाही करण्यात येईल.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. सारसनगर या भागाला **"क्रांतीज्योती सावित्रीआई फुलेनगर"** असे नामकरण करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे. सदर बाबत संपूर्ण सोपस्कार पार पाडण्यात येउन नामकरणाबाबत कार्यवाही करण्यात यावी. तसेच मा.सदस्यांचे मागणीनुसार सारसनगरकडे जाणा-या रस्त्यावर **"क्रांतीज्योती सावित्रीआई फुलेनगर"** नावाची कमान बसविण्यास देखील ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.श्री.बाळासाहेब मारुती बोराटे,

अनुमोदक - मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ३६** **दिनांक : ३०/१२/२०१७.**

---

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील भिंगार स.नं.३४४/१,३४४/२ या मंजुर रेखांकनातील खुली जागा (क्षेत्र १५९१.००) यशवंत माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना क्रीडांगण म्हणून मिळणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- मुख्याध्यापक यशवंत माध्यमिक विद्यालय मुकुंदनगर, फकीरवाडा यांचा ०७/०७/२०१७ रोजीचा अर्ज.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सादर करण्यात येते की, भिंगार स.नं.३४४/१, ३४४/२ या मंजुर रेखांकनातील खुली जागा (क्षेत्र १५९१.००) यशवंत माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी क्रीडांगण या वापरासाठी ३ वर्षाच्या मुदतीने खालील अटी व शर्तीवर देण्यास महासभा इराव क्र. ३८ दिनांक २१/०१/२०१० अन्वये जा.क्र.टि.पी.६०५ दिनांक १५/०५/२०१० नुसार मंजुरी देण्यांत आलेली होती. त्यानुसार त्यांची ३ वर्षाची मुदत दिनांक १४/०५/२०१३ रोजी संपलेली असुन त्यांनी संदर्भीय अर्जान्वये मुदतवाढ मिळणे बाबत विनंती केलेली आहे. त्यानुसार त्यांना खालील अटी व शर्तीवर देण्यास हरकत नाही.

१) सदर खुली जागा ही कायमस्वरुपी खुली ठेवावी. त्यामध्ये कोणतेही बांधकाम करता येणार नाही.
२) सदर जागेची मालकी कायमस्वरुपी महानगरपालिकेची राहील.
३) सदर खुली जागा नागरिकांसाठी वापरण्यास खुली ठेवणे आवश्यक राहील.
४) सदर खुली जागा अन्य संस्थेस परस्पर भाडयाने देता येणार नाही.
५) सदर जागेचा वापर विद्यार्थ्यांसाठी फक्त क्रीडांगण म्हणुन करण्यात यावा.
६) सुरुवातीस ही जागा तीन वर्षासाठी देण्यात यावी. त्यानंतर वेळोवेळी मा.आयुक्त यांचेकडुन मुदत वाढ घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.
७) संस्थेने जागेचा गैरवापर केल्याचे आढळुन आल्यास तसेच वरील अटी / शर्तींचा भंग केल्याचे आढळुन आल्यास कोणत्याही पुर्व सुचने शिवाय महानगरपालिका सदर खुली जागा परत ताब्यात घेईल.

उपरोक्त मुदत संपलेली असल्याने अट क्र. ६ नुसार सदर जागेच्या वापरासाठी मुदत वाढ मिळणे बाबत उपरोक्त संदर्भीय अर्ज इकडेस प्राप्त झाला असुन त्यानुसार मुदतवाढ देणे योग्य होईल. प्रस्ताव महासभेपुढे ठेवण्यास आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.आयुक्त साो, यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

**चर्चा :-**

विषय क्र.३६ चे वाचन करण्यात आले.

**मा.श्री.शेख नजीर अहमद अ.रज्जाक :-** जागा देण्यास आमचा विरोध आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** मुदतवाढ असेल तर प्रशासनाचे काम आहे. स्टॅडींग कमीटीचा विषय आहे.किमान ११ वर्षाकरीता दया नवीन नसेल तर दया.

**मा.श्रीमती.नसीम शेख :-** सदर ओपनस्पेस मधील त्या लेआउटमधील प्लॉट धारकांचा विरोध लक्षात घेता आमचा या विषयास विरोध आहे.सदर भागातील स्थानीक नगरसेवक सय्यद नसीम व फैय्याज शेख व प्लॉट धारक यांची हरकत नोंदविण्यात यावी.आमचा या विषयाला विरोध आहे. प्लॉट धारकांचे हरकतीचे पत्र मी मा.आयुक्तांना सादर करीत आहे.

**सभागृह नेता मा.श्री.गणेश कवडे :-** स्थानीक प्लॉट धारकांची हरकत नोंदवुन विषय मंजुर करण्यात यावा.

**मा.महापौर मॅडम :-** ज्या सदस्यांनी विरोध नोंदविला त्यांची हरकत नोंदवुन मुदतवाढ विषयास मंजुरी देण्यात येत आहे.

पुढील विषय घ्या.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील भिंगार स.नं.३४४/१,३४४/२ या मंजुर रेखांकनातील खुली जागा (क्षेत्र १५९१.००) यशवंत माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना क्रीडांगण म्हणून ३० वर्षे मुदतीने देण्यास ही सभा मान्यता देत आहे. सदर जागेचे भाडे डिपॉझिट करारनामा आदी बाबत पुढील योग्य ती कार्यवाही प्रशासनाने पार पाडण्याच्या दृष्टिने नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करावी.

मा.सौ.मनिषा सुखदेव बारस्कर मा.श्री.सचिन तुकाराम जाधव व यांनी दिलेल्या पत्रानुसार सावेडी स.नं. २२९/१ अ/१ चे २९ आर. ही जागा खेळाच्या मैदानासाठी आरक्षीत असुन या जागेजवळील महाराष्ट्र तांत्रिक शिक्षण मंडळ अहमदनगर या शाळेतील विद्यार्थ्यांना क्रीडांगण म्हणून सदरची जागा २९ वर्षे मुदतीने देण्यास ही सभा मान्यता देत आहे. सदर जागेचे शासकीय दराने भाडे डिपॉझिट करारनामा आदी बाबत पुढील योग्य ती कार्यवाही प्रशासनाने पार पाडण्याच्या दृष्टिने नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करावी.

सूचक - मा.सौ.मनिषा सुखदेव बारस्कर,

अनुमोदक - मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ३७** **दिनांक : ३०/१२/२०१७.**

---

प्रस्तावाचा विषय :- महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार अनधिकृत व नियमबाह्य मोबाईल मनोरे / बांधकाम दंड / प्रशमन शुल्क आकारुन नियमीत करणे बाबत..

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) दुरसंचार सुविधांच्या जाळयासाठी उपकरणाची व बेस स्टेश यांच्या उभारणीसाठीचा सर्व समावेशक विलीयम अंतर्भुत करणे बाबत दि.०४/०३/२०१४ रोजीचा शासन निर्णय.

२) ड वर्ग विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०१६ मधील नियम क्र.३१.७ (बी) नुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत

३) अहमदनगर महानगरपालिका ठराव क्र.६ दिनांक १५/०३/२००८.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील विनापरवाना उभारण्यात आलेल्या मोबाईल टॉवर नियमितीकरणा बाबत महासभा ठराव क्र.६ दि.१६/०६/२००८ अन्वये १,५०,०००/- दंड आकारणी करणे बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्वये वैधानीक कार्यवाही करण्यात आलेली होती. या ठरावाच्या आधारे अनाधिकृत टॉवर बाबत नगररचना विभागाने मोठया प्रमाणावर दंड वसुली केली होती.

तथापि नंतरच्या काळात म्हणजेच सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पामध्ये महासभा ठराव क्र.६ दि.१५/०३/२००८ अन्वये रक्कम रुपये १,५०,०००/- प्रशमन शुल्क वाढवुन रक्कम रुपये ३,००,०००/- करणेच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आल्याचे निदर्शनास येते. उक्त प्रशमन शुल्क आकारणीमुळे मोबाईल मनो-यांना अधिकृत परवानगी घेण्याचा कल कमी झाल्याचे निदर्शनास येते. व अनाधिकृत मोबाईल टॉवर उभारण्याची प्रवृत्ती वाढत असल्याचे निदर्शनास येते परीणामी महानगरपालिकेकडे परवानगीसाठी परीपुर्ण प्रस्ताव प्राप्त होत नाही.

दरम्यानच्या काळात काही विनापरवाना मोबाईल मनोरे प्रशमन शुल्क आकारुन नियमीत करण्यात आलेले आहेत. तदनंतर मा.शासनाने संदर्भ क्र.१ नुसार धोरण निश्चित केले आहे. त्यानुसारअंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे. या धारणानुसार विकास शुल्क, उपकर याचे व्यतिरिक्त प्रशासकीय शुल्क रुपये ३०,०००/- इतके वसुल करण्याची तरतुद आहे.

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ पोटकलम १ ए.ए.खंड (सी) व्दारे प्राप्त अधिकारान्वये दि.०४/०३/२०१४ रोजी उक्त अधिसुचनेस मंजुरी देण्यात आलेली असल्याने उक्त प्रस्तावाप्रमाणे प्रशमन शुल्क न आकारणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली होती.

महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व ड वर्ग महानगरपालिकांसाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०१६ मंजुर केलेली असुन उक्त विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील नियम क्र.३१ अन्वये मोबाईल टॉवर उभारणीबाबत परवानगीसाठी विहीत कार्यपध्दती नमुद केलेली आहे. उक्त विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील नियम क्र.३१.७ (बी) नुसार विनापरवाना उभारण्यात आलेले टॉवर नियमीत करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्वये दंड / प्रशमन शुल्क आकारणे बाबत मा.आयुक्त यांना सुचीत करण्यांत आलेले आहे. तथापि कलम १४३ अन्वये दंड

ठरविण्याचा अधिकार मा.महासभेस आहेत. त्यानुसार विनापरवाना उभारण्यात आलेल्या मोबाईल टॉवर नियमीत करणेबाबत सध्या महासभेने टॉवर करीता रक्कम रुपये ३,००,०००/- इतक्या दंडाची आकारणी करणेबाबत मंजुरी दिलेली आहे. तथापि ही आकारणी काहीशी जास्त आहे असे या विभागाचे मत आहे. कारण सध्या उभारले जाणारे मनोरे हे प्रगत तंत्रज्ञान वापरुन कमी उंचीचे व कमी क्षेत्राचे आहेत. त्यांना टॉवर उभारणीसाठी सुमारे २ ते ३ लाख रुपये खर्च येतो. तसेच हे मनोरे नटबोल्टच्या सहाय्याने उभारण्यात येत असल्याने ते Dismental करुन खाली उतरवता येणे फारसे अवघड नाही. दंडाची रक्कम वाढविल्यास कंपन्या असे मनोरे Dismental करुन संपुर्ण दंड वाचविण्याचा प्रयत्न करतील त्यामुळे असा दंड प्रमाणात असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीकोनातुन ३,००,०००/- ही रक्कम अवाजवी वाटते.

तरी अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील विनापरवाना उभारण्यात आलेल्या मोबाईल टॉवर बांधकाम नियमीत करणेसाठी अनाधिकृत बांधकाम क्षेत्राबाबत महासभा ठराव क्र.६ दि.१५/०३/२००८ अन्वये तसेच विनापरवाना टॉवर उभारणी नियमीत करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्वये खालील प्रमाणे प्रशमन शुल्क / दंड आकारणे योग्य होईल असे या विभागाचे मत आहे. सबब खालील प्रमाणे दरांना मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव मा.महासभेस सादर करणे योग्य होईल.

| | |
|---|---|
| १) Ground Base Tower (G.B.T.) | = १,५०,०००/- |
| २) Roof Top Tower (RTT) | = १,००,०००/- |
| ३) Single pol Tower (SPT) | = १,००,०००/- |
| ४) पुर्वीच्या प्रचलीत पध्दतीप्रमाणे उभारलेले मनोरे | = १,५०,०००/- |

यावर मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

--*--

**चर्चा :-**

विषय क्र.३७ चे वाचन करण्यात आले.ऑफिस रिपोर्ट वाचन करण्यात आले.

**मा.श्री.योगीराज गाडे :-**२००८ ला दिड लाख युजर्स होते आज तिपटीने युजर्स वाढले आहेत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** हा प्रस्ताव कोणी आणला.

**स.सं.नगररचनाकार श्री.धोंगडे :-** नगररचना विभागाने सादर केला आहे.१५-३-२००८ रोजी ठराव पारित झाला त्यावेळी महानगरपालिकेची चांगली वसुली झाली. सन ११-१२ च्या बजेटमध्ये १.५ लाखाचे ३ लाख भाडे आकारणी करणेबाबत मंजुरी देण्यात आली. अधिकृत ५० टॉवरला परवानगी दिली.

**मा.श्री.संजय घुले :-**२२० टॉवर अनधिकृत आहे असे तुमचे म्हणणे आहे.जयभवानी टेली सर्व्हीसेस यांचेकडुन किती वसुली झाली.६ कोटी ८३ लाख येणे आहे. जय भवानीने ५३ लाख फक्त वसुल केले.भाडे आकारणी कमी तुम्ही लोकांसाठी करता का मनपासाठी करता. टॉवरवाले बाहेर जात असतील तर जावु दया.आमचा या विषयाला विरोध आहे. हा विषय स्थगीत करा.कोर्टात दावा दाखल असताना या विषयावर चर्चा करता कशाला.चर्चा करता येणार नाही.

मा.उपमहापौर- नगरशहरात जेवढे मोबाईल टॉवर आहेत ३ लाख दंड कशा बाबतीत आहे.

प्रतिवर्षी भाडे त्यांना लावतो का कशा पध्दतीने लावतो.मागच्या वर्षी किती वर्षासाठी आपण कशाप्रकारे भाडे आकारतो का दंड आकारतो याची माहिती दया.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ५४ लाख रु आपल्याला आले का.

**स.सं.नगररचनाकार श्री.धोंगडे :-** ५४रु.हे प्रॉपर्टी टॅक्स पोटी जमा झाले आहेत.

**श्री.झीने,रिव्हीजनविभाग :-**आतापर्यंत रु.५७लाख जमा केले.ते जनरल फंडात जमा केले.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ५७ लाख परस्पर चेक काढण्यात आले.५७ लाखाचे वर्गीकरण दया.कोणाकोणाचे बील काढले.ते काम कोणते.१६-१७ च्या अंदाजपत्रकात नवीन मोबाईल टॉवर हेड निर्माण केले आहे.त्यात ही रक्कम जमा केली नाही.आम्ही आयुक्त साहेबांना शास्ती माफी करणेबाबत मागणी केली ती मंजुर केली नाही.पैसे जमा करायचे इतर ठिकाणी वापरायचे टॉवर हेडखाली काही काम नोंदवली का.

**प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** सदर लेखाशिर्षाखाली कामे नोंदविली आहेत.

**मा.श्री.दिप चव्हाण :-**सदर लेखाशिषकाखाली किती रककम शिल्लक आहे.

**प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** लेखाविभाग याबाबत माहिती देवु शकेल.४ कोटी रु तरतुद दर्शवली आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ५७ लाख मनपा फंडात टाकले. हे कोणत्या नियमात बसते. संकलीत कराची डिमांड किती तेवढी वसुल होत नाही मग आपण डिमांड कमी करतो का.आर व्ही संकलीत कर कमी करता का मग यात ३ लाखाची वसुली होत नाही म्हणुन आपण १.५ लाख करतो .वसुल करायची जबाबदारी तुमची आहे प्रत्येक सभेत नगरसेवकाने तुमच्या निदर्शनास या बाबी आणायच्या .झिनेंकडे हा टेबल कसा आला.

**श्री.झिने,रिव्हाजन विभाग :-** असेसमेंटचे काम माझ्याकडे आहे.हा टेबल नगररचनाचा आहे.

**अति.आयुक्त श्री.वालगुडे साहेब :-** टॉवरचे दोन हेड आहेत प्रशमन शुल्कापोटी होणारी वसुल व प्रॉपर्टी टॅक्स ही आकारला जातो.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** आर व्ही कशा पध्दतीने आकारतो.

**श्री.झीने,रिव्हीजन विभाग :-** टॉवरचे मासीक भाडे अंदाजे १०हजार गृहीत धरले तर १०X१२ -१लाख २०हजार मधुन १०टक्के घसारा वजा जाता १लाख ८ हजार इतकी आरव्ही येते त्यावर विविध ५२ टक्के कर आकारणी केली जाते.२७टक्के सर्वसाधारण कर व त्यावर सर्व कर मिळुन ५२ टक्के आपण टॅक्स आकारतो.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** त्या मालकाने भाडयाने दिले असेल तर .

**श्री.झीने,रिव्हीजन विभाग :-**एखादयाने भाडयाने जागा दिली तर त्याला दुप्पट दराने आकारणी करतो.नगररचना विभागाकडुन बांधकाम परवानगी घेतली नसेल तर त्याला महानगरपालिका अधिनियमातील कलम २६७अ प्रमाणे दुपटी इतकी दंड आकारणी केली जाते.

**मा.उपमहापौर श्री.छिंदम :-** टॉवरला दर महिन्याला किती भाडे आकारले जाते,कशा पध्दतीने आकारले जाते.१० वर्षासाठी टॉवर लावले अनधिकृत टॉवर लावले त्याला कशाप्रकारे भाडे लावतात.दंड कशा प्रकारे आकारला जातो.

**स.सं.नगररचनाकार श्री.धोंगडे :-** भाडे आकारले जात नाही. प्रॉपर्टी टॅक्स आकारतो. प्रॉपर्टी टॅक्स जनरल फंडात जमा केला जातो सेप्रेट भाडे आकारले जात नाही.

**मा.उपमहापौर श्री.छिंदम :-** आपण टॉवरवर भाडे आकारत नाही प्रॉपर्टी टॅक्स प्रमाणे आकारतो.आपण जर इतर महानगरपालिकेत माहिती घ्यावी.मी अमरावती, मीराभाईदर या मनपाकडील माहिती घेतली. ५२ टक्के या व्यतिरिक्त अग्नीशमन सेवा शुल्क, व रिन्युअल चार्जेस असे ४० हजार आकारते.आपलीच

मनपा अशाप्रकारे आकारत नाही.त्यांना दिड लाख दंड आकारा. सभागृहाचा कल विचारात घ्या. २५०मोबाईल टॉवरच्या माध्यमातुन प्रतिवर्षी १ कोटीचे उत्पन्न वाढेल.वनटाईम ३ लाख दंड आकारतो.त्या वेळेपासुन कोणी भरत नाही.४ कोटीची तरतुद केलेली आहे.विविध विकास कामासाठी कामे खतवली आहे.त्यातील बीले देण्यासाठी मनपाचे बजेटवर ताण येणार नाही.आपल्या मनपाने सेप्रेट आकारणी करावी.

**मा.श्री.अनिल शिंदे :-**३ लाख ठराव झाल्यांनतर किती टॉवरधारकांनी रक्कम भरली.

**स.सं.नगररचनाकार श्री.धोंगडे :-** सन ११-१२ ला ठराव केला आतापर्यंत १रु जमा झाला नाही. सन २०१४ मध्ये जी अधिसुचना दिली डिपा. ऑफ टेलीकम्युनिकेशन दिल्लीची मंजुरी घ्यावी लागेल त्या शिवाय दि.१२-२-१४ ला ना.हायकोर्टाची ऑर्डर झालेली आहे. मनपा कोणत्याही टॉवर बंद करु शकत नाही. सन २०११-१२ च्या बजेटमध्ये एकदम डबल रेटमध्ये वाढ झाली. टॉवर बांधायला १.५लाख खर्च येत असेल तर ३ लाख कसे आकारणी करावी. टॉवरच्या वेगवेगळया रचनेनुसार आकारणी केली जाते.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** दिल्लीला आपण काय पाठपुरावा केला.

**मा.श्री.अभय आगरकर :-** कोणत्याही ऑर्डर चॅलेंज करायचा अधिकार प्रत्येकाला आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-**२२० मोबाईल टॉवरला परवानगी नाही.

**मा.श्री.अभय आगरकर :-** आपण ज्या वेळेस ३ लाख केले त्या वेळेस आपण सभागृहाला काय मार्गदर्शन केले. नगरपालिकेच्या अखत्यारीत व्यवसाय करता एमएसईबी ला सुध्दा टॅक्स लावु शकतो. यांचेकडुन चार्जेस वसुल करु शकता. टॉवर च्या संदर्भात इतर महानगरपालिकाकडुन माहिती घ्या.

**मा.उपमहापौर श्री.छिंदम :-** ५२%प्रॉपर्टी टॅक्स व्यतिरिक्त ४०%शूल्क वसुल करता येईल.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** शास्तीची रक्कम किती आहे.२%शास्ती का लावली नाही

**श्री.झीनें,रिव्हीजन विभाग :-** बीलात शास्तीची रक्कम ॲड आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** वसुली करण्याचा ठेका दिला त्या ठेकेदाराने रक्कम का वसुल केली नही

**मा.उपमहापौर श्री.छिंदम :-** सन्माननीय नगरसेवकांचा विरोध नोंदवा.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** एखादा विषय अशा चुकीच्या पध्दतीने मंजुर करत असाल तर प्रशासनाची जबाबदारी राहील.

**मा.उपमहापौर श्री.छिंदम :-** प्रतिवर्षी जर उत्पन्नात वाढ होत असेल तर विरोध असणा-यांचा विरोध नोंदवुन विषय मंजुर करा.

**मा.महापौर मॅडम :-** प्रस्तावात सुचवलेल्या प्रत्येकी रकमेमध्ये रूपये २५ हजाराची वाढ करण्यात यावी व हा विषय मंजुर करण्यात येत आहे.

**मा.श्री.संजय घूले :-** आमचा या विषयाला विरोध नोंदवा.

मा.कैलास गिरवले,मा.गणेश भोसले,माअभिषेक कळमकर, मा.संपत बारस्कर यांचा विरोध नोंदवण्यात यावा

**मा.महापौर मॅडम :-**पुढील विषय घ्या.

--*--

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार अनधिकृत व नियमबाह्य मोबाईल मनोरे / बांधकाम दंड / प्रशमन शुल्क आकारणे बाबत ऑफिस रिपोर्टमध्ये

दर्शविलेल्या रक्कमेत प्रत्येकी रक्कम रु.२५,०००/- ची वाढ करण्यात यावी. यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच मा.उपमहापौर श्री.श्रीपाद शंकर छिंदम यांनी सुचविल्याप्रमाणे अग्निशमन सेवा शुल्क, रिन्युअल चार्जेस आकारणी बाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. खर्च मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.श्री.बाळासाहेब मारुती बोराटे,

अनुमोदक - मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ३८** **दिनांक : ३०/१२/२०१७.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मंजूर विकास योजना, अहमदनगर (मुळ हद्द) (दुसरी सुधारीत)
मौजे सावेडी, अहमदनगर येथील स.नं.२२८,२२९,२३० व १९४ पैकी २ हेक्टर जमिनीवर मंजुर विकास योजनेत सार्वजनिक सुविधा (Public Aminity) हे आरक्षण प्रस्तावित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधिल कलम ३७ अन्वये फेर बदलाची कार्यवाही करणे बाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ - १) मा.महासभा ठराव क्र.४० दिनांक १५/१०/२०१३.
२) या कार्यालयाचे पत्र क्र.५७८९ दिनांक २८/०७/२०१४
३) मा.सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांचे पत्र क्र.टिपीएस.३११२ दिनांक १७/१०/२०१४.
४) या कार्यालयाचे पत्र क्र.५०७१ दि.०६/०९/२०१७.
५) मा.उपायुक्त,मनपा यांचे पत्र पाणीपुरवठा ९७१ दि.०७/१२/२०१७.

१) महासभा ठराव क्र.४० दि.१५/१०/२०१३ अन्वये विषयांकित जागेवर महानगरपालिकेसाठी सिवेज डिस्पोजल वर्क्स (Sewage Disposal Works) हे आरक्षण क्र.२१६ अ, प्रस्तावित करणेस मा.महासभेने मंजुरी दिलेली होती. सदर मंजुरीच्या अनुषंगाने या विभागाने कलम ३७ अन्वये सदर आरक्षण टाकणे बाबतची जाहीर सुचना शासनाच्या राजपत्रात स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करुन सुचना हरकती माबविणे इत्यादी कार्यवाही पुर्ण करुन अहमदनगर महानगरपालिकेने संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये सविस्तर प्रस्ताव मा.शासनाच्या नगरविकास विभागाकडे विहीत मार्गाने सादर केलेला आहे.

२) सदर प्रस्तावाची छाननी करण्यासाठी मा.सहाय्यक संचालक नगररचना, अहमदनगर यांनी संदर्भीय पत्र क्र.३ अन्वये सदर जागेचा मोजणी नकाशा, प्रकल्पा बाबत सविस्तर तपशिल इत्यादी बाबींची पुर्तता करणे बाबत कळविले होते.

३) उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने या कार्यालयाने संदर्भीय पत्र क्र.४ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय मागीतलेला होता.

४) संदर्भीय पत्र क्र.५ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांनी शासनाच्या अमृत अभियाना अंतर्गत अहमदनगर शहर भुयारी गटार योजनेच्या पहिल्या टप्प्याला मान्यता मिळाली असुन त्यासाठी आपण सुचविलेली जागा कमी पडत असुन सदर योजनेसाठी किमान २ हेक्टर इतक्या जागेची सदर परिसरात आवश्यकता असले बाबत कळविलेले आहे.

५) उपरोक्त महासभा ठराव क्र.४० मधील जागेचे क्षेत्र आणि अमृत अभियाना अंतर्गत शहर भुयारी गटार योजनेसाठी आवश्यक असलेले क्षेत्र यामध्ये तफावत आहे. पुर्वीचा प्रस्ताव ३१ आर क्षेत्राचा होता व आता किमान २ हेक्टर इतक्या जागेची आवश्यकता असले बाबत पाणीपुरवठा विभागाने नमुद केलेले आहे. त्यामुळे पुर्वीचा महासभा ठराव क्र.४० अन्वये केलेली कार्यवाही रद्द करुन त्याच भागात पुर्वीच्या प्रस्तावातील जागेच्या लगत नव्याने मोठ्या क्षेत्रासाठी आरक्षण प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

६) महासभा ठराव क्र.४० अन्वये पुर्वीची जागा सिवेज डिस्पोजल वर्क्स या हेतुसाठी आरक्षीत करणेबाबत प्रस्तावित केलेले होते. तथापि या आरक्षणाचा हेतु बदलुन त्याऐवजी या आरक्षणाचा हेतु सार्वजनिक सुविधा (Public Aminity) या कारणासाठी करणे आधिक संयुक्तीक होईल. कारण सिवेज डिस्पोजल वर्क्सचे काम कमी क्षेत्रात पुर्ण झाल्यास उर्वरीत क्षेत्र बगीचा किंवा इतर कारणासाठी वापरता येणे शक्य आहे. मुळ हरित पट्टा या विभागात समाविष्ट असलेल्या या पब्लीक ॲमिनीटी (Public Aminity) आरक्षणात खालील प्रमाणे वापर अनुज्ञेय होतील अशी स्पष्ट तरतुद पुढील प्रमाणे करणे आवश्यक आहे.

तरतुद - (In Addition to users Permissible in Green Belt Zone wide rule No. २५:७ Sewage Disposal Works and allied users may be permited)

७) वरील हेतुसाठी दर्शविलेले आरक्षण सावेडी स.नं.२२८, २२९, २३० व १९४ पैकी जागेत असुन सदर जमिन सिना नदी लगत आहे. त्याचे क्षेत्र अंदाजे २.५० हेक्टर इतके आहे हे आरक्षण दर्शविणारा भाग नकाशा सोबत जोडलेला आहे.

वर नमुद केले प्रमाणे महासभा ठराव क्रमांक ४० दिनांक १५/१०/२०१३ हा ठराव व त्या अनुषंगाने केलेली कार्यवाही रद्द करुन वर नमुद क्षेत्रानुसार नविन सुधारीत ठराव करणे आवश्यक आहे.

सबब महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ३७ अन्वये कार्यवाही पुर्ण करणेस मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी मा.महासभेपुढे सादर करणे योग्य होईल.

यावर मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :-**

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** हा विषय कोणी घेतला त्याबाबत माहिती दया.

**स.सं.नगररचनाकार श्री.धोंगडे :-** पूर्वी एक ठराव क्र. ४० १५-१०-१३ ठरावाप्रमाणे ३१ गुठे जागा सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॅन्टसाठी राखुन ठेवली होती .पाणी पुरवठा विभागाच्या प्रस्तावानसुार सदर कार्यवाही करण्यात आली.कलम ३७ अन्वये ज्या प्रोसेस पुर्ण कराव्या लागतात त्या सर्व पुर्ण करण्यात आल्या आहेत.या प्रस्तावास एडीटीपी कडुन बॅक क्युरी आली ती काढल्यानंतर पाणीपुरवठा विभागाकडे पाठवले पाणीपुरवठा विभागाने पत्र दिले की प्रस्तावीत ३१ गुंठे जागा हि प्रकल्पासाठी पुरणार नाही कमीत कमी २ हेक्टर जागेची आवश्यकता आहे.पुर्वी जो मंजुर प्रस्ताव होता त्याला एकत्र करुन सदरचा प्रस्ताव तयार केला .इतरही काम करताना अडचणी येवु नये जागा उरली तर इतरही कामे त्यात करता येतील.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** स.नं २२८-२२९ जागा कोठे आहे.

**सं.सं.नगररचनाकार श्री.धोंगडे :-**ग्रीनबेल्टमध्ये आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** ग्रीनबेल्टमध्ये आपण कशालाही परवानगी देत नाही मग हा विषय मंजुर कशाला करायचा.

**स.सं.नगररचनाकार श्री.धोंगडे :-**सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॅन्टसाठी ही जागा योग्य आहे यापुर्वी ३१ गुठयांचा प्रस्ताव मुंबईला पाठविला होता.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** आपण काही योजना त्या ठिकाणी राबवु शकत नाही मग कशाला मंजुरी घ्यायची.

**मा.श्री.सचिन जाधव :-** विषय मंजूर करा.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** केडगावला प्लॅस्टीक सेंटर उभारणीसाठी आम्ही पत्र दिले.असे आणखी विषय घेवुन पुढच्या सभेत विषय घ्या.पैठणकर यांनी त्यावर काही कार्यवाही केली नाही.पुढच्या वेळेस ज्यांचे विषय आहेत ते घ्या आज हा विषय स्थगीत ठेवा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** स्पील वर्कला तरतुद करावी. इतिवृत्तात नोंद घ्यावी.

**मा.महापौर मॅडम :-** विषय महत्वाचा आहे. मा.केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेपैकी आहे. या योजनेसाठी या जागेची गरज आहे. त्यामुळे सदर विषय स्थगित ठेवणे योग्य होणार नाही.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** महत्वाचा विषय असल्याने त्याठिकाणी योजना राबविता येईल विषय मंजूर करावा. सदर फेरबदल प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी मा.शासनास सादर करणेसाठी सभेने मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांना प्राधिकृत करावे. मा.आयुक्तांनी पुन्हा ठराव न घेता मा.शासनास मंजूरी करीता सादर करावा.

**मा.महापौर मॅडम :-** विषय मंजूर.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. मंजूर विकास योजना, अहमदनगर (मुळ हद्द) (दुसरी सुधारीत) मौजे सावेडी, अहमदनगर येथील स.नं.२२८,२२९,२३० व १९४ पैकी २ हेक्टर जमिनीवर मंजुर विकास योजनेत सार्वजनिक सुविधा (Public Aminity) हे आरक्षण प्रस्तावित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधिल कलम ३७ अन्वये फेर बदलाची कार्यवाही करणे बाबतच्या प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे. वैधानीक कार्यवाही पूर्ण करून मा.शासनास तसा प्रस्ताव सादर करणेस तसेच या करीता येणारा खर्च मंजूर. मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांना सदर फेरबदलाची कार्यवाही पूर्ण करुन मा.शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी प्राधिकृत करण्यांत येत आहे. मा.आयुक्त यांनी सदर प्रकरणाची वर्तमान पत्रात जाहीर प्रकटन देउन महाराष्ट्र शासन राजपत्रान्वये प्रसिध्दी देण्यात यावी. मा.आयुक्त यांनी सदर प्रस्ताव पुन्हा सभेत न घेता प्रस्ताव मा.शासना कडे मान्यतेस्तव पाठविण्यात यावे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे,

अनुमोदक - मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका